## राज्यशास्त्र जनरल-१०१- अ: भारतीय संविधान

### प्रथम सत्र अभ्यासक्रम

| | |
|---|---|
| **१. भारतीय संविधान-** | भारतीय संविधानाची निर्मितीची प्रक्रिया,सरनामा व त्याची मुल्ये,संविधानाची वैशिष्टये |
| **२. भारतीय संघराज्य प्रारूप व कार्यपद्धती-** | रचना,वैशिष्टये,केंद्र आणि राज्य यांच्यातील बदलते प्रवाह,वित्त आयोग- रचना, अधिकार व कार्य |
| **३. हक्क आणि कर्तव्य-** | अ) मूलभूत हक्क<br>ब) मूलभूत कर्तव्य<br>क) राज्याच्या धोरणाची मागदर्शक तत्त्वे |
| **४. अधिकाराच्या संदर्भात अलिकडील बदल-** | अ) माहितीचा अधिकार- अर्थ,स्वरूप, माहिती अधिनियम २००५, केंद्रीय व राज्य माहिती आयोग- रचना, अधिकार व कार्य<br>ब) भारतातील मानव अधिकार- अर्थ, भारतीय राज्यघटना आणि मानवाधिकार, भारतातील मानवाधिकार आयोग- रचना-अधिकार व कार्य |

## प्रकरण- १. ले
## भारतीय संविधान

**प्र.१ ला. भारतीय संसदीय लोकशाहीची पायाभरणी करणारे बिटिशकालीन प्रमुख कायदे सांगा?**

**किंवा**

**भारतीय घटनेला प्रभावित करणारे कायदे स्पष्ट करा?**

**किंवा**

**भारतीय घटनेची ऐतिहासिक पाश्वभूमी स्पष्ट करा?**

ईस्टइंडिया कंपनीने इ.स. १६०० मध्ये राणी एलिझाबेथकडून सनद घेऊन भारतात ब्रिटिश सत्तेची पायाभरणी केली.१७७३ च्या रेग्युलेटिंग कायदयापासून ब्रिटिश पार्लमेंटने भारताच्या अंतर्गत कारभारावर नियंत्रण ठेवण्यास सुरूवात केली.१८५७ च्या बंडानंतर ब्रिटिश पार्लमेंटने ईस्टइंडिया कंपनीची सत्ता नष्ट करून इंग्लंड राजाची सत्ता प्रस्तापित केली.ब्रिटिश राजा भारतमंत्रीच्या नेमणूक करून भारताच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवित असे.शासनाची सुत्रे गव्हर्नर जनरल व त्याला सहाय्य करणाऱ्या चार सदस्याच्या समितीकडे सोपविण्यात आली.गव्हर्नर राजाचा प्रतिनिधी म्हणून काम करू लागला.इंग्रजांनी भारतातील लोकशाही प्रक्रियेला चालना देण्यासाठी पुढील कायदे केलेले दिसतात.

१. **प्रथम कौन्सिल कायदा** (१८६१)**-** हा कायदा भारतातील लोकशाही निर्मितीतील प्रथम प्रयत्न मानला जाता.या कायदयाने कायदेविषयक सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले.कायदा करण्याचा अधिकार असलेल्या गव्हर्नर व चार सदस्यासह सहा ते बारा गैरसरकारी भारतीय सदस्य असतील. त्यांची नेमणक गव्हर्नरकडून केली जाईल ही तरतूद करण्यात आली.या कायदामळे भारतीयांना कायदे निर्मितीच्या कामाचा अनुभव आला.त्यामुळे भारतात लोकशाहीच्या निर्मितीला अनुकूल वातावरण तयार होऊ लागले.

२. **दुसरा कौन्सिल कायदा** (१८९२)**-** लॉर्ड मेया व लॉर्ड रिपनने केलेल्या ठरावामुळे लोकशाही विकेंद्रीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन देण्याचे कार्य केले परंतु हे प्रयत्न भारतीयाचा अंसतोष कमी करू शकले नाही.भारतीयाचा अंसतोष कमी करण्यासाठी इंग्रजांनी हा कायदा केला.या कायदयानुसार प्रांतिक व केंद्रीय समित्यामध्ये वाढ करण्यात आली.या समित्याच्या प्रतिनिधीची अप्रत्यक्ष का होईना निवड करण्यासाठी निवडणूक पद्धतीची सुरूवात केली.समितीचे अधिकार वाढविण्यात आले.अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा किंवा प्रश्न विचारण्याचा अधिकार सदस्यांना देण्यात आला.

३. **१९०९ चा सुधारणा कायदा-** या कायदानुसार कायदेमंडळात बिनसरकारी सदस्यांची संख्या वाढविण्यात आली.कायदेमंडळाताल सदस्यांना अंदाजपत्रकासहित सर्व विषयावर चर्चा करण्याचा पंसती वा नापंसती दाखवण्याचा अधिकार देण्यात आला.अर्थात कायदेमंडळाचे निर्णय गव्हर्नरवर बंधनकारक नसल्यामुळे जबाबदार शासन निर्माण होऊ शकले नाही.या कायदयानुसार मुसलमान व शीखांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले आणि हिंदु व मुसलमानांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न या कायदयाने केला.

४. **१९१९ चा सुधारणा कायदा-** या कायदयानुसार प्रांतिक राज्यकारभार द्विद्‌ल शासन पद्धती सुरू करण्यात आली.महत्वाची खाती राखीव ठेऊन त्यांची जबाबदारी इंग्रजाकडे देण्यात आली तर कमी महत्वाच्या सोपीव खात्याची जबाबदारी भारतीयाकडे देण्यात आली.केद्रात द्विगृही कायदेमंडळ निर्माण करण्यात आले. प्रथम गृहाला लोकसभा आणि द्वितीय गृहाला राज्यसभा नाव देण्यात आले.मतदानाचा अधिकार मर्यादित लोकांना देण्यात आला.मतदानासाठी मालमत्ता व शिक्षणाची अट टाकण्यात आली.

५. **१९३५ चा भारत प्रशासन कायदा -** या कायदयानुसार केंद्रात दुहेरी शासन व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला.संरक्षण व परराष्ट्र सारखे महत्वाचे विषय गव्हर्नरकडे देण्यात आले.कमी महत्वाच्या खात्याची जबाबदारी भारतीयांकडे देण्यात आली.मात्र मंत्रीमडळाचे निर्णय गव्हर्नरवर बंधनकारक नव्हते.गव्हर्नर मंत्रीमंडळाचे निर्णय फेटाळत असल्याने जबाबदार शासन निर्माण होऊ शकले नाही.या कायदयानुसार भारतात संघराज्याची निर्मिती करण्यात आली.प्रांतात स्वयंशासनाची पद्धत सुरू करण्यात आली.मुख्यमंत्री व मंत्रीमंडळकडे सत्ता सोपविण्यात आली.या कायदयानुसार संघराज्य न्यायलयाची स्थापना करण्यात आली.

६. **क्रिप्स योजना-** भारतीयांचा अंसतोष कमी करण्यासाठी पंतप्रधान चर्चिल यांनी क्रिप्स याना भारतात पाठविले.क्रिप्स यानी काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदु महासभा आणि संस्थानिकाशी चर्चा करून आपली योजना जाहीर केली.या योजनेनुसार महायुद्ध समाप्तीनंतर भारताला औपचारीक स्वातंत्र्य दिले जाईल.ज्या संस्थानिकांना संघराज्यात राहायचे नसेल त्याना स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला जाईल.केंद्रात राष्ट्रीय सरकार स्थापनेस क्रिप्स मिशने विरोध केल्यामुळे काँग्रेसने ही योजना फेटाळली.पाकिस्तानच्या मागणीचा समावेश नसल्यामुळे मुस्लिमलीगने देखील ही योजना फेटाळली.

७. **कॅबिनेट मिशन योजना-** दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडमध्ये सत्ता बदल झाला.मजूर पक्षाचे ॲटली पंतप्रधान बनले.त्यानी भारताला लवकरात लवकर स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली.त्यासाठी कॅबिनेट मिशन भारतात पाठविले.या मिशनच्या योजनेनुसार हिंदुस्थानात संघराज्य निर्माण करून हिंदुस्थान अखंड राहणार होता.धार्मिक व जातीय प्रश्न बहुमताच्या आधारावर सोडवले जाणार होते.घटना निर्माण करण्यासाठी घटनापरिषद स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.घटना तयार होईपर्यत नेहरूच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सरकार निर्माण करण्यात आले.मात्र मुस्लिम लीगने पाकिस्तान निर्मितीसाठी घटनेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.पाकिस्तानची मागणी मान्य व्हावी म्हणून प्रत्यक्ष कृती दिन साजरा केला.परिणामतः देशभर हिंदू-मुस्लिमांचे दंगे सुरू झाले.

८. **फाळणीची योजना-** पाकिस्तानच्या मागणीवरून काँग्रेस व मुस्लिम लीगमध्ये तडजोड होऊ शकली नाही.पाकिस्तान निर्माण केल्याशिवाय ब्रिटिशांनी भारत सोडू नये ही मुस्लिम लीगने मागणी केली म्हणून गव्हर्नर मांऊट बॅटनने फाळणीची योजना जाहीर केली.या योजनेनुसार हिंदुस्थान अखंड राहू शकत नसेल तर पंजाब व बंगाल प्रांताची फाळणी करावी.पूर्व बंगाल, पश्चिम पंजाब आणि सिंध प्रांताचा पाकिस्तानमध्ये समावेश करावा.सरहद्द प्रांत व बलुचिस्तान येथे सार्वमत घेऊन कोणत्या तरी एका देशात त्याचा समावेश करावा.संस्थानिकाना स्वतंत्र राहता येईल किंवा भारत व पाकिस्तान या दोन्हीपैकी एका देशात जाता येईल.दोन्ही देशासाठी स्वतंत्र घटनासमिती निर्माण केल्या जातील.फाळणी मान्य झाल्यानंतर देशाच्या सीमा निश्चित केल्या जातील.या योजनेला कॉग्रेस व मुस्लिम लीगने मान्यता दिली.ब्रिटिश पार्लमेंटच्या मान्यतेनंतर हिंदुस्थानची फाळणी झाली.

९. **भारत स्वातंत्र कायदा-** या कायदयानुसार भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात येतील.या राष्ट्रसाठी एक गर्व्हनर नेमला जाईल.घटना अंमलात आल्यानंतर त्याला परत बोलविले जाईल.यापुढे ब्रिटिशांचा कोणताही कायदा दोन्ही राष्ट्रांना लागू होणार नाहीत.दोन्ही देशाच्या कायदेमंडळाना राज्यकारभारासाठी कायदे करता येतील.ब्रिटिशाचे संस्थानिकांबरोबरचे सर्व तह करार रद्द होतील.तसेच भारत सचिव पदाची समाप्ती करून प्रशासन दोन्ही देशांच्या सरकाराकडे देण्यात येईल.

इंग्रजांनी केलेल्या वरील कायदयामुळे भारतातील संसदीय लोकशाहीच्या विकासास वा पायाभरणीस मदत झालेली असल्याने या कायदयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**घटना समिती-**

कॅबिनेट मिशन योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या अप्रत्यक्ष पद्धतीने निवडणुका घेण्यात आल्या.प्रांताच्या कायदेमंडळामार्फत घटना समितीचे सदस्य निवडण्यात आले.मूळ योजनेनुसार घटना समिती ३८९ सदस्य होते.त्यात २९६ सदस्य ब्रिटिश प्रांतातून आणि ९३ सदस्य संस्थानिकाकडून निवडावयाचे होते.घटना समिती निवडणुकीत कॉग्रेसला २११ आणि मुस्लिम लीगला ७३ जागा मिळाल्या.घटनासमितीत कॉग्रेसला बहुमत मिळालेले असले तरी अनेक नामवंत व्यक्ती समितीवर निवडून आल्या.त्यात बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेद्र प्रसाद, सरदार पटेल, बेगम रसूल, विजया लक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, श्यामाप्रसाद मुखर्जी, बॅ.जयकर इ.समावेश होता.मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या मागणी वरून घटनेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.९ डिसेंबर १९४६ ला घटनासमितीचे पहिले अधिवेशन झाले.या अधिवेशनात डॉ.राजेद्र प्रसाद यांची घटनासमितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.पंडित नेहरूनी भारतचे सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याबाबतचा ठराव मांडला.या ठरावावर दुसऱ्या अधिवेशनात चर्चा होऊन ठराव मंजूर झाला.मुस्लिम लीगने बहिष्कार टाकल्यामुळे घटनेच्या कामाला गती

येऊ शकली नाही.मात्र फाळणीनंतर घटनेच्या कामकाजाला गती आली.घटनेच्या तिसऱ्या अधिवेशनात विविध समितीची निर्मिती करण्यात आली.त्यात २९ ऑगस्ट १९४७ ला मसुदा समिती निर्माण करण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकराना मसुदा समितीचे अध्यक्ष करण्यात आले.समितीत सात सदस्य होते त्यात के.एम.मुन्शी, डी.पी.खेतान, गोपाल स्वामी अय्यंगार, एन.माधवराव, सय्यद सादुल्ला, टी.टी.कृष्णमचारी इ.चा समावेश होता.बी.आर.राव घटनेचे कायदेविषयक सल्लागार होते.मसुदा समितीने विविध देशातील घटनाचा अभ्यास करून घटनेचा कच्चा आराखडा प्रसिद्ध केला.या आराखडयावर जवळ जवळ ७६२५ सूचना भारतीयांनी केल्या.त्यापैकी २४७३ सूचनावर समितीत विचार करण्यात आला.२६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी समितीने घटना स्विकृत व मान्य केली.२६जानेवारी १९५० पासून घटनेची अंमलबजावणी सुरू झाली.घटना तयार करण्यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवस इतका कालखंड लागला.घटनेच्या आराखडयावर ११४ दिवस विस्तृत चर्चा झाली.घटना एकमताने स्वीकारलेली असली तरी बॅ.जसकरच्या मते भारतीय घटना सार्वभौम नाही.कारण घटना समितीच्या सदस्याची निवड प्रत्यक्ष जनतेकडून  झालेली नव्हती.निवडणुका घेतल्या असत्या तर प्रचंड वेळ व पैसा खर्च झाला असता त्यामुळे घटना निर्मितीला विलंब लागला असता.म्हणून घटनेच्या अप्रत्यक्ष निवडणुका घेण्यात आल्या.तसेच भारतीय जनतेने किंवा कोणत्याही राजकिय पक्षाने घटना मान्य नाही असे म्हटलेले नाही.याचा अर्थ घटना भारतीयांना मान्य आहे.

**प्र.२रा.भारतीय राज्यघटनेतील सरनामा किंवा उद्देशपत्रिकेचे विश्लेषण करून त्यातील तत्वज्ञान सांगा?**

प्रत्येक देशाची राज्यघटना विशिष्ट उद्देश लक्षात घेऊन लिहिली जाते.त्या उद्देशाचा समावेश उद्देशपत्रिकेत केलेला असतो.सरनामा घटनेचा आत्मा मानला जातो.भारतीय घटनेचा सरनामा पंडित नेहरूंनी लिहिलेला आहे.

**घटनेचा सरनामा वा उद्देशपत्रिका-**आम्ही भारतीय लोक, भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारताच्या सर्व नागरिकांना,

न्याय-आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय

स्वातंत्र्य-विचार, उच्चार, धर्म, श्रद्धा आणि उपासना

समता-समान संधी आणि दर्जाबाबत

बंधुता-व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्टाची एकात्मता व अंखडता राखण्याची शाश्वती देऊन,

२६  नोव्हेंबर १९४९ या दिवशी घटना मान्य व स्वीकृत करत आहोत.

**सरनाम्याचे विश्लेषण, तत्वज्ञान किंवा आधारभूत तत्वे-**

१. **घटनेचे उगमस्थान भारताय जनता-**उद्देशपत्रिकेत आम्ही भारतीय जनता घटना तयार करून मान्य करीत आहोत असा उल्लेख आहे याचा अर्थ घटना भारतीय जनतेने तयार करून स्वईच्छेने स्वीकारलेली आहे, असा अर्थ निघतो.वास्तविक घटनासमिती प्रत्यक्ष जनतेद्वारा निवडली नव्हती.सदस्य अप्रत्यक्ष मार्गाने निवडले होते.परंतु घटना समितीच्या निवडणुका घेतल्या असत्या तर वेळ व पैशांची हानी झाली असती तसेच भारतातील कोणत्याही राजकिय पक्षाने वा जनतेने घटना रद्द करावी ही मागणी केलेली नाही याचा अर्थ सर्व भारतीयांना घटना मान्य आहे.
२. **सार्वभौम-** १५ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१५ऑगस्ट १९४७ ते २६ जानेवारी १९५० पर्यंत भारताचे स्वरूप वसाहतीच्या राज्याचे होते.कारण तोपर्यंत इंग्लंडची राणी भारताची कायदेशीर प्रमुख होती.२६ जानेवारी घटना लागू झाल्यानंतर भारत सार्वभौम देश बनला.कारण भारतावर कोणत्याही देशाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष  नियत्रण नाही.अंर्तगत व बर्हिगत दृष्टया भारत पूर्ण स्वतंत्र आहे.भारत राष्ट्रकुल संघटनेचा सदस्य असला तरी  ते सदस्यत्व सार्वभौमच्या आड येत नाही.मित्रत्वाचे संबंध टिकवून ठेवण्यासाठी भारत राष्ट्रकुल संघटनेचा सदस्य झाला आहे.

३. **प्रजासत्ताक-** प्रजासत्ताक म्हणजे शासन व्यवस्थेत जनतेचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग होय.भारताचा राज्यकारभार जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत चालतो.प्रतिनिधी ठराविक काळासाठी निवडून दिलेले असतात.जनता आपली इच्छा प्रतिनिधीमार्फत व्यक्त करतात.प्रौढमताधिकाराच्या तत्वानुसार प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिलेला असतो.

४. **गणराज्य-** गणराज्य म्हणजे राजा नसलेले राज्य होय किंवा ज्या देशाचा सर्वोच्च प्रमुख जनतेने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गाने विशिष्टकाळासाठी निवडून दिलेला असतो.त्या देशाला गणराज्य असे म्हणतात.उदा- भारताचा सर्वोच्च प्रमुख राष्ट्रपती जनतेकडून अप्रत्यक्षरित्या पाच वर्षासाठी निवडून दिलेला असतो.म्हणून भारत गणराज्य आहे.या उलट इंग्लंडमध्ये गणराज्य नाही.कारण इंग्लंडचा राजा वंशपरापरागत पद्धतीने सत्तेवर येतो.

५. **स्वातंत्र्य** -भारतातील नागरिकांच्या व्यक्तिमत्त्वविकासासाठी विचार, उच्चार, श्रद्धा,धर्म व उपासना इ.बाबतचा स्वातंत्र्याचा उल्लेख सरनाम्यात केलेला आहे.स्वातंत्र व्यक्तीविकासासाठी आवश्यक असल्याने या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यायोग्य परिस्थिती भारत सरकारने निर्माण करावी ही घटनाकारांची अपेक्षा होती.

६. **समता-** समता म्हणजे सारखेपणा नव्हे तर मानवनिर्मित विषमता नष्ट करून सर्वांना विकासाची समान संधी आणि दर्जा उपलब्ध करून देणे होय.धर्म, जात, वंश, लिंग व वर्ण इ.आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान संधी व दर्जा उपलब्ध करून देणे हा घटनाकाराचा मुख्य उद्देश होता.

७. **न्याय-** घटनेच्या सरनाम्यात सामाजिक, आर्थिक व राजकिय क्षेत्रात न्याय उपलब्ध करून देणे शासनाचे उद्दिष्ट राहिल.न्याय हा राजकिय व्यवस्थेचा आत्मा असतो.समाजात न्याय प्रस्तापित केल्याशिवाय व्यक्तीची उन्नती होणार नाही.घटनेने सामाजिक न्याय प्रस्तापित करण्यावर भर दिला आहे. अस्पृश्यता निवारण, मागास जातीना सवलती इ.गोष्टी सामाजिक व आर्थिक न्यायासाठी आहेत.राजकिय न्यायासाठी सर्वांना प्रौढमताधिकाराचा अधिकार दिलेला आहे.

८. **बंधुता-** भारतात पूर्वीपासून जातीवाद, प्रांतवाद इ.समस्या आहेत.या समस्यामुळे राष्ट्रांच्या ऐक्य निर्मितीला बाधा येतो.व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मता कायम ठेवण्यासाठी वरील भेदाभेद नष्ट करून बंधुभाव निर्माण करणे आवश्यक आहे.म्हणून घटनाकारानी स्त्री व पुरूषांना समान अधिकार देऊन समतेच्या आधारावर बंधुत्वाची उभारणी करण्याचा प्रयत्न केला.

९. **समाजवाद-** या शब्दाचा समावेश ४२ व्या घटनादुरूस्तीने सरनाम्यात केला.समाजवादाला खाजगी मालमत्ता व भांडवलशाही मान्य नाही.देशातील श्रमिकाचे शोषण थांबविण्यासाठी श्रीमंत व गरिबातील दरी कमी करण्यासाठी भारताने समाजवादाचा स्वीकार केलेला आहे.समाजवाद म्हणजे उत्पादन साधनावर आणि वितरण व्यवस्थेवर समाज वा राज्याची मालकी वा नियंत्रण होय.

१०. **धर्मनिरपेक्षता-** सरनाम्यात हा शब्द ४२ व्या घटनादुरूस्तीने समाविष्ट करण्यात आला.धर्मनिरपेक्ष म्हणजे राज्याचा अधिकृत असा कोणताही धर्म राहणार नाही.कोणत्याही विशिष्ट धर्माला राज्य पाठिंबा देणार नाही.सर्व धर्मांना समान मानले जाईल.धर्म ही वैयक्तिक बाब असून प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे कोणत्याही धर्माची पूजा अर्चा करता येईल.धर्म बदलता येईल.याचा अर्थ कोणत्याही धर्माला भारताने राजाश्रय दिलेला नाही.

११. **राष्ट्रीय एकात्मता व अखंडता-**या शब्दाचा समावेश ४२ व्या घटनादुरूस्तीने केलेला आहे.लोकशाहीत प्रत्येकाला प्रतिष्ठा दिली जाते.त्यामुळे व्यक्तीत स्वाभिमानाची भावना तयार होते ही भावना राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपयुक्त मानली जाते.व्यक्तीचे देशावर प्रेम असल्यास व्यक्ती कोणताही त्याग करायला तयार असते.देशाच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय एकात्मतेचा सरनाम्यात करण्यात आला.त्यासाठी कोणत्याही घटकराज्याला संघराज्यातून बाहेर पडता येत नाही.त्यासाठी केंद्राला जास्त अधिकार दिले आहेत.

**प्र.२ रा.भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये सांगा?**

प्रत्येक देशाची राज्यघटना देशाच्या राजकीय जीवनाची आधारशिला मानली जाते.जनतेच्या इच्छा आकांक्षाचे प्रतिनिधित्व ज्या नियमात दिसते.त्या नियम व कायदेसंग्रहाला राज्यघटना असे म्हणतात.घटनाकारांनी घटना तयार करताना अनेक देशाच्या घटनांचा अभ्यास करून घटना तयार केली.भारतीय घटनेवर अनेक देशाच्या घटनांचा प्रभाव दिसतो.संसदिय पद्धत इंग्लडकडून तर संघराज्यपद्धत अमेरिकेकडून, फ्रॉन्स व अमेरिकेकडून मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्व आर्यलँडकडून तर दक्षिण आफ्रिकेच्या घटनेतून घटनादुरूस्ती पद्धत आणि मूलभूत कर्तव्य रशियाच्या घटनेतून घेतलेले दिसतात.भारतीय घटनेची वैशिष्टयै पुढील प्रमाणे

१. **सर्वात मोठी व लिखित राज्यघटना-** भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना मानली जाते.भारताने संघराज्य शासन पद्धतीचा अवलंब केलेला असल्यामुळे लिखित राज्यघटना आवश्यक असते.मूळ घटनेनुसार ३९५ कलमे, ८ परिशिष्ट आणि २२ विभाग घटनेत समाविष्ट होते.४२ व्या आणि इतर दुरूस्तीनी घटनेत काही नवीन कलमांचा समावेश केला.सद्या घटनेत ४०५ कलमे २४ विभाग आणि १० परिशिष्ट आहेत.घटना इतकी प्रदीर्घ असण्याचे कारण म्हणजे राजकीय अनुभवहीनता होय.तसेच केंद्र-राज्य संबंध, मूलभूत हक्क इ.तरतूदी घटनेत सविस्तर दिल्यामुळे घटनेचा आकार वाढला.

२. **संसदीय शासन पध्दती -** स्वातंत्रपूर्व काळात इंग्रजानी भारतात संसदीय लोकशाही रूजविण्याचा प्रयत्न केला तसेच भारतातील बऱ्याच नेत्याचे शिक्षण इंग्लंड झालेले असल्यामुळे त्यांना संसदीय लोकशाहीचा अनुभव होता.म्हणून स्वातंत्रानंतर आपण संसदीय लोकशाही स्वीकारली.या लोकशाहीत कायदेमंडळातून कार्यकारीमंडळ निर्माण होते.कार्यकारीमंडळ कायदेमंडळाला जबाबदार असते. जोपर्यत कायदेमंडळाचा विश्वास आहे तोपर्यत कार्यकारीमंडळाला सत्तेवर राहता येते.संसदीय लोकशाहीत नामधारी व वास्तव हे दोन प्रमुख असतात.आपण इंग्लंडकडून संसदीय लोकशाही घेतली असली तरी त्यात काही बदल केलेले आहेत.उदा.राष्ट्रपतीचे आणीबाणीचे अधिकार हा अधिकार इंग्लंडच्या राजाला नाही.

३. **संघराज्य शासन पद्धती -** भारतीय राज्यघटनेने संघराज्य शासन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.संघराज्यात केंद्र व घटकराज्यात वेगवेगळी सरकारे असतात.संघराज्यात अधिकार विभागणीसाठी तीन विषय सूची दिलेल्या आहेत.केंद्रसुचीत ९७ विषय, राज्यसुचीत ६६ विषय आणि समवर्तीसुचीत ४७ विषयाचा समावेश आहे.या अधिकार विभागणीचा विचार करता भारतीय संघराज्यात केंद्रसरकारला जास्त अधिकार दिलेले दिसतात.त्यामुळे भारतीय संघराज्य केंद्रप्रधान दिसून येते.केंद्र आणि राज्यात निर्माण झालेल्या संघर्षाचे निराकरण करण्यासाठी घटनेने सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुर्नविलोकनाचा अधिकार दिला आहे.

४. **प्रौढमताधिकार-** भारतीय घटनेने संपत्ती व मालमत्तेची अट न टाकता वयाची २१ वर्ष पूर्ण झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला.त्या अधिकाराला प्रौढमताधिकार म्हणतात.६१ वी घटनादुरूस्ती करून मतदानासाठी वयाची अट २१ वर्षावरून १८ वर्ष इतकी करण्यात आली.

५. **राष्ट्रपतीचे आणीबाणीचे अधिकार-**शांततेच्या काळात संघराज्य आणि संकटाच्या काळात एकात्म राज्य हे भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप आहे.संकटाला तोंड देण्यासाठी घटनेने राष्ट्रपतीला तीन प्रकारची आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार दिलेला आहे.राष्ट्रीय आणीबाणी ३५२ कलम, ३५६ कलम राज्य आणीबाणी व ३६० कलम आर्थिक आणीबाणी तसेच आणीबाणीची घोषणा केल्यानंतर एका महिन्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते अन्यथा आणीबाणी स्थगित वा रद्द होते.आणीबाणीच्या काळात मूलभूत अधिकार स्थगित होतात. घटकराज्याचे अधिकार कमी होतात. त्यांना केंद्राच्या आदेशाप्रमाणे काम करावे लागते.

६. **एकेरी नागरिकत्व आणी एकच राज्यघटना-** भारतात संघराज्य असूनही दुहेरी नागरिकत्वाची पद्धत नाही.घटकराज्यांना नागरिकत्व देण्याचा अधिकार नाही.नागरिकत्व फक्त केंद्र सरकार देऊ शकते.घटनेच्या पाच ते अकरा कलमामध्ये नागरिकत्वाबाबतच्या तरतूदी दिलेल्या आहेत.तसेच भारतात एकच राज्यघटना दिसून येते.घटकराज्यांना स्वतंत्र घटना निर्माण करता येत नाही.राज्यकारभार विषयक सर्व बाबींचा घटनेत

समावेश असल्याने आणी राज्यांना संघराज्यातून फुटून बाहेर निघण्याचा अधिकार नसल्यामुळे एकच राज्यघटना दिसून येते फक्त जम्मू काश्मिर राज्यासाठी स्वतंत्र घटना आहे.

७. **स्वतंत्र व एकेरी न्यायव्यवस्था -** भारतात संघराज्य असूनही अमेरिकेसारखी दुहेरी न्यायव्यवस्था नाही.भारतात एकेरी न्यायव्यवस्था आहे.न्यायलयाची रचना पिरॅमिड सारखी आहे.सर्वात वरच्या पातळीवर सर्वोच्च न्यायलय त्यानंतर उच्च न्यायलय आणि सर्वात शेवटी दुय्यम न्यायलये दिसून येतात.सर्वोच्च न्यायलय सर्वश्रेष्ठ व अंतिम न्यायलय मानले जाते.त्याचा निकाल सर्व न्यायालयावर बंधनकारक मानला जातो.न्यायमंडळाच्या स्वातंत्र रक्षणासाठी न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्रपतीकडून केली जाते.त्यांना वेतन व नोकरीची शाश्वती दिली जाते.

८. **मूलभूत हक्क -** भारतीय घटनेच्या तिसऱ्या भागात १२ ते ३५ कलमात मूलभूत अधिकाराचा समावेश आहे.मूळ घटनेत सात अधिकाराचा समावेश होता.४४ व्या घटना दुरूस्तीने मालमत्तेचा अधिकार मूलभूत हक्काच्या यादीतून वगळलेला आहे.सद्या घटनेत समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, धार्मिक स्वातंत्र इ.सहा प्रकारच्या हक्काचा घटनेत समावेश आहे.मूलभूत हक्काना न्यायलयाचे संरक्षण आहे.हक्कावर कोणीही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास न्यायालयात दाद मागता येते.

९. **मार्गदर्शक तत्वे-** घटनेच्या चौथ्या भागात ३६ ते ५१ कलमामध्ये मार्गदर्शक तत्वे दिसून येतात.या तत्त्वांना न्यायलयाचे संरक्षण नसल्यामुळे त्यांचे पालन करणे सरकारवर बंधनकारक नाही.मार्गदर्शक तत्वे नैतिक हक्क आहेत त्यांना कायदयाचे संरक्षण नसले तरी ही तत्वे जनतेच्या कल्यासाठी आवश्यक असल्यामुळे कोणतेही सरकार या तत्वांकडे दुर्लक्ष करू शकत नाही कारण सरकारच्या यशाचे मूल्यमापन या तत्त्वांच्या आधारावर केले जाते.

१०. **अशतः परिदृढ आणि अशतः परिवर्तनीय -** इंग्लंडची राज्यघटना सर्वात परिवर्तनीय मानली जाते तर अमेरिकेची घटना सर्वात परिदृढ मानली जाते.भारतीय घटनाकारानी वरील दोन्ही पद्धतीचा त्याग करून घटनकारांनी घटना अशतः परिवर्तनीय आणी अशतः परिदृढ स्वरूपाची बनवली आहे.घटनेत घटनादुरूस्तीच्या तीन पद्धती दिलेल्या आहेत.घटनेतील कमी महत्वपूर्ण भाग साध्या बहुमताने बदलता येतो.याउलट घटनेतील महत्वपूर्ण भागात बदल घडवून आणण्यासाठी विशेष बहुमत व निम्मे राज्याची मान्यता आवश्यक आहे.या दोन्ही मार्गाचा अवलंब घटनाकारानी केलेला आहे.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. भारतीय राज्यघटनेचा सरनामा कोणी लिहिला होता.
उत्तर-भारतीय राज्यघटनेचा सरनामा पंडित नेहरू यांनी लिहिला होता.

२. सार्वभौमत्व म्हणजे काय ते सांगा?
उत्तर- कोणत्याही देशाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियत्रंण नसणे आणि अंर्तगत व बर्हिगतदृष्टया पूर्ण स्वतंत्र असणे म्हणजे सार्वभौम होय.भारत हा सार्वभौम देश आहे.

३. गणराज्य म्हणजे काय?
उत्तर- देशाचा सर्वोच्च प्रमुख प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या जनतेकडून विशिष्ट काळासाठी निवडून येतो त्यास गणराज्य म्हणतात.भारत गणराज्य देश आहे.कारण भारताचा सर्वोच्च प्रमुख राष्ट्रपती जनतेकडून निवडून येतो.

४. ४२ व्या घटनादुरूस्तीने सरनाम्यात कोणत्या तत्त्वाचा समावेश केलेला आहे.
उत्तर- ४२ व्या घटनादुरूस्तीने घटनेत समाजवाद, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता शब्दाचा समावेश केलेला आहे.

५. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय?
उत्तर- राष्ट्राचा अधिकृत धर्म नसणे आणि सर्व धर्माना समान वागणूक देणे म्हणजे धर्मनिरपेक्षता होय.

६. मसुदा समितीच्या दोन सदस्यांची नावे लिहा.
उत्तर- डॉ.बाबासाहेब आंबेडकर, के.एम.मुंन्शी, गोपाळस्वामी अय्यंगार आणि डी.पी.खेतान

७. प्रतिनिधीक लोकशाहीचे दोन प्रकार कोणते?

उत्तर- अ) संसदीय लोकशाही ब) अध्यक्षीय लोकशाही

**८.** घटना समितीतील दोन स्त्री प्रतिनिधीची नांवे सांगा.
उत्तर - बेगम रसूल, विजयालक्ष्मी पंडित, हंसा मेहता आणि सरोजिनी नायडू

**९.** संसदीय लोकशाहीची दोन प्रमुख वैशिष्टये सांगा.
उत्तर -अ) कार्यकारीमंडळ कायदेमंडळाला सामुहिकरित्या जबाबदार असते.कायदेमंडळाचा विश्वास असेपर्यत सत्तेवर राहते.कायदेमंडळाने अविश्वास प्रस्ताव मंजुर केल्यास कार्यकारीमंडळला राजीनामा दयावा लागतो.

ब) कायदेमंडळातून कार्यकारीमंडळ निर्माण होते.कार्यकारीमंडळाचे सदस्य कायदेमंडळाच्या कार्यात सक्रिय सहभात घेतात.

**१०.** घटना समिती आणि मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते?
उत्तर- घटना समिती अध्यक्ष- डॉ. राजेंद्रप्रसाद आणि मसुदा समिती अध्यक्ष - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**११.** घटना समितीच्या दोन सदस्यांची नांवे सांगा.
उत्तर- पंडीत जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बॅ.जयकर

**१२.** घटना समितीचे कामकाज किती दिवस चालले ते सांगा.
उत्तर- घटना समितीचे कामकाज २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवस चालले होते.

**१३.** भारतीय राज्यघटनेत एकूण किती कलमे व प्रकरणे आहेत ते सांगा.
उत्तर - भारतीय राज्यघटनेत ३९५ कलमे आणि १० परिशिष्ट आणि २४ विभाग आहेत.

**१४.** धर्मनिरपेक्ष राज्याची दोन वैशिष्टये सांगा.
उत्तर - अ) धर्मनिरपेक्षता म्हणजे राज्याचा अधिकृत धर्म राहणार नाही .

ब) राज्य सर्व धर्माना समान स्थान व समान संरक्षण देईल.प्रत्येकाला वैयक्तिक जीवनात धर्म पालनाचा अधिकार असेल.

**१५.** भारतीय राज्यघटना केव्हा स्वीकृत आणि अंमलात आली ते सांगा.
उत्तर-२६ नोंव्हेबर १९४९ ला घटना घटनापरिषदेने स्वीकृत करण्यात आली.२६ जानेवारी १९५० पासून घटनेची अंमलबजावणी करण्यात आली.

**१६.** भारतीय घटनेतील कोणत्या कलमांत आणि किती प्रकारच्या घटनादुरूस्ती पद्धती दिलेल्या आहेत.
उत्तर- घटनेच्या ३६८ कलमात घटनादुरूस्तीची पद्धत दिलेली असून त्यात साधे बहुमत, विशेष बहुमत आणि विशेष बहुमत व निम्मे राज्याची मान्यता या तीन प्रकारे घटनादुरूस्ती करता येते.

## प्रकरण- २ रे

## भारतीय संघराज्य प्रारूप व कार्यपद्धती

### प्र.१ ला भारतीय संघराज्याची वैशिष्टये किंवा लक्षणे सांगा?

भारतीय राज्यघटनेत संघराज्य वा Federation या शब्दाचा कुठेही उल्लेख नाही.त्या ऐवजी Union किंवा राज्याचा संघ हा शब्द वापरलेला आहे.डॉ.आंबेडकरांच्या मते संघराज्य शब्दापेक्षा Union हा शब्द जास्त एकतावादी आहे.तसेच घटकराज्यांनी करार करून संघराज्य निर्माण केलेले नाही.त्यामुळे Union शब्दाचा घटनेत वापर केलेला आहे.

**संघराज्याचे स्वरूप-** भारतीय संघराज्य इतर देशातील संघराज्यापेक्षा वेगळे आहे.संघराज्य निर्मितीच्या दोन पद्धती आहेत.

**अ) केंद्राकर्षी पद्धत-** घटकराज्यांनी करार करून संघराज्य निर्माण केल्यास त्या पद्धतीला केंद्राकर्षी पद्धत असे म्हणतात.उदा. अमेरिकेतील १३ वसाहतींनी करार करून अमेरिकन संघराज्याची निर्मिती केली आहे.

**ब) विकेंद्रीकरण पद्धत-** या पद्धतीत मध्यवर्ती सरकार प्रशासनाच्या सोयीसाठी संघराज्य निर्माण करते.उदा.१९३५ च्या कायदयान्वये केंद्रसरकारने प्रशासनाच्या सोईसाठी भारतात संघराज्य निर्माण केले.

**भारतीय संघराज्याची लक्षणे वा वैशिष्टयै-**

भारतीय संघराज्यात केंद्राला वाजवीपेक्षा जास्त अधिकार दिलेले आहेत.घटकराज्यांना अत्यंत कमी वा दुय्यम दर्जाचे अधिकार दिलेले आहेत.त्यामुळे भारतीय संघराज्याला अर्धसंघराज्य वा संघराज्याचा मुखवटा असलेले एकात्म राज्य अशी टीका केली जाते.भारतीय संघराज्यावर टीका होत असली तरी संघराज्य शासन पध्दतीची वैशिष्टयै घटनेत दिसून येतात.

१. **विकेंद्रीकरण पद्धत-**भारतात संघराज्याची निर्मिती विकेंद्रीकरण पद्धतीतून झालेली असल्यामुळे केंद्रसरकाराला जास्त अधिकार दिलले आहेत.घटनेत संघराज्य शब्दाऐवजी राज्याचा संघ असा शब्द वापरलेला आहे.तसेच संसदेला नवीन राज्य निर्माण करण्याचा वा नष्ट करण्याचा अधिकार दिलेला आहे.

२. **लिखित राज्यघटना -** संघराज्य हा राज्याचा विशिष्ट ध्येयपूर्तीसाठी एकत्र राहण्याचा करार आहे.हा करार लिखित असल्याशिवाय संघराज्याला स्थैर्य लाभणार नाही.म्हणून भारतीय राज्यघटना लिखित असून घटनेत केंद्र-राज्य संबंध दिलेले दिसून येतात.

३. **परिदृढता-** केंद्र -राज्य संबंध प्रस्थापित करणारी घटना परिदृढ असली पाहिजे.कारण केंद्रसरकार घटनादुरूस्ती करून राज्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करणार नाही किंवा त्यांचे अधिकार कमी करणार नाही.यासाठी भारतीय राज्यघटना परिदृढ ठेवलेली आहे.

४. **अधिकार विभागणी -**संघराज्य शासन पद्धतीत केंद्र व राज्यात अधिकार विभागणी केलेली असते.घटनेने केंद्राला ९७ विषय व राज्याला ६६ तर समवर्ती सूचीत ४७ विषयाचा समावेश आहे.समवर्तीसूचीतील विषयावर केंद्र व राज्य दोघांनाही कायदा करता येतो.या अधिकार विभागणीमुळे परस्परांच्या अधिकारावर अतिक्रमण होत नाही.

५. **न्यायमंडळाचे सर्वश्रेष्ठत्व -**घटनेने न्यायमंडळाला श्रेष्ठ स्थान दिलेले आहे.कारण केंद्र व राज्य यांनी ऐकमेकांच्या अधिकारावर अतिक्रमण केल्यास किंवा दोघांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास या संघर्षावर तोडगा काढण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिलेला आहे.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असतो.

६. **आणीबाणीची तरतूद -** संकटावर मात करण्यासाठी घटनेने राष्ट्रपतींना आणीबाणीचे अधिकार दिलेले आहेत.आणीबाणीच्या काळात संघराज्याचे रूपांतर एकात्म राज्यात होते.आणीबाणीत राज्यांना केंद्राचे आदेश पाळावे लागतात.म्हणून या काळात राज्याचे अधिकार कमी होतात.

**प्र.२ रा.भारतीय संघराज्याचे एकात्म स्वरूप स्पष्ट करा?**

**किंवा**

**भारतात केंद्रसरकार बलवान आहे या विधानाची चर्चा करा?**

भारतीय राज्यघटनेत संघराज्याची वैशिष्टये असली तरी केंद्राला जास्त अधिकार दिल्यामुळे भारत संघराज्य नसून एकात्म राज्य आहे ही टीका केली जाते.त्यासाठी खालील कारणे दिली जातात.

१. **केंद्राकडे जास्त अधिकार -** केंद्र व राज्य अधिकार विभागणी करताना घटनेत तीन विषय सूचीचा उल्लेख आहे.केंद्रसुचीत ९७ विषय तर राज्यसुचीत ६६ विषय आणि समवती सुचीत ४७ विषयांचा समावेश आहे.समवतीसूचीवर केंद्र व राज्य या दोघांना कायदा करता येतो मात्र एकाच विषयावर दोघांनी कायदा केल्यास केंद्राचा कायदा श्रेष्ठ ठरतो आणि राज्याचा कायदा रद्द ठरतो. ज्या विषयाचा उल्लेख घटनेत नाही त्यांना शेषअधिकार असे म्हणतात.त्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे.राष्ट्रहितासाठी राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव मंजूर केल्यास राज्यसुचीतील विषयावर केंद्राला कायदा करता येतो.याचा अर्थ केंद्राला सर्व विषयावर कायदा करता येतो.त्यामुळे केंद्राची सत्ता आपोआप वाढते.

२. **राज्यपालाची नेमणूक** -राज्यपाल हा घटकराज्याचा घटनात्मक प्रमुख असतो.त्यांची नेमणूक राष्ट्रपती मार्फत होते.राष्ट्रपतीची इच्छा असेपर्यंत तो पदावर राहतो.राज्यपालाच्या माध्यमातून केंद्रसरकार राज्यावर प्रशासकीय नियंत्रण प्रस्तापित करण्याचा प्रयत्न करते.राज्यपाल केंद्राचा हस्तक म्हणून काम करतो.राज्यपाल पदामुळे संघराज्य शासन पद्धतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

३. **राष्ट्रपती राजवट -** एखादया घटकराज्यात घटनेनुसार राज्यकारभार चालत नसेल तर असा अहवाल राज्यपालाने राष्ट्रपतीला पाठविल्यास आणि राष्ट्रपतीची खात्री झाल्यास, राष्ट्रपती त्या राज्यासाठी राष्ट्रपती राजवट जाहीर करतो.ही राजवट लागू झाल्यास राज्याचे मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ आणि विधिमंडळ बरखास्त होते.ही तरतूद संघराज्याच्या तत्वांशी विसंगत आहे.

४. **एकच राज्यघटना-** भारतात संघराज्य असूनही संपूर्ण देशासाठी एकच राज्यघटना आहे. घटकराज्यांना घटनानिर्मितीचा अधिकार नाही.तसेच घटनादुरूस्तीचा अधिकार सुद्धा केंद्राला आहे.संसदेने पाठविलेल्या घटना दुरूस्ती विधेयक मंजुरी वा नामंजुरी देण्याचा अधिकार राज्यांना आहे.घटनादुरूस्तीसाठी फक्त निम्मे राज्याची मान्यता आवश्यकअसते.घटनादुरूस्तीच्या अधिकारामुळे केंद्रसरकार आपले अधिकार वाढून घेताना दिसते.

५. **असुरक्षित राज्ये -** भारतीय संघराज्य असूनही घटकराज्याची स्वायत्ता अबाधित ठेवली जात नाही.संघराज्य शासनपद्धतीत नवीन राज्यांची निर्मिती वा नवीन प्रदेशाचा समावेश राज्यांच्या संमती शिवाय केला जात नाही.मात्र भारतात राज्यांच्या अस्तित्वाची हमी घेतलेली नाही. नवीन राज्य निर्माण करणे वा राज्याचा आकार बदलणे इ. अधिकार संसदेला आहेत केंद्र याबाबतचे विधयेक राज्याकडे पाठविते पण राज्याचा निर्णय केंद्रावर बंधनकारक नाही.

६. **आर्थिक उत्पन्न वाटप-** घटनेने केंद्र व राज्य याच्यांत आर्थिक उत्पन्न वाटप केलेले आहे.मात्र उत्पन्न वाटप करतांना केंद्राकडे जास्त उत्पन्न देणारे कर दिलेले आहेत.याउलट राज्याकडे खर्चिक विषय दिलेले आहेत.त्यामुळे राज्य आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण नाहीत.म्हणून राज्यांना केंद्राच्या मदत व अनुदानावर अवलंबून राहावे लागते.अनुदान देतांना केंद्र भेदभाव करते.यामुळे देखील राज्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतात.

७. **एकेरी नागरिकत्व व एकेरी न्यायव्यवस्था** -भारतात संघराज्य असूनही अमेरिकेसारखी दुहेरी न्यायव्यवस्था नाही.संपूर्ण भारतासाठी एकेरी न्यायव्यवस्था आहे.घटकराज्याना स्वतंत्र न्यायलये निर्माण करण्याचा अधिकार नाही.सर्वोच्च न्यायलय अंतिम व सर्वश्रेष्ठ न्यायलय आहे.त्याचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो.त्यामुळे देखील राज्याच्या हक्कांवर संकोच होतो.तसेच भारतात दुहेरी नागरिकत्वाऐवजी एकेरी नागरिकत्वाची पद्धत आहे.नागरिकत्वाबद्दल कायदे करण्याचा वा नागरिकत्व देण्याचा अधिकार फक्त केंद्राला आहे.

८. **समान प्रतिनिधित्व नाही-**भारतीय संघराज्यात सर्व घटकराज्यांना समान प्रतिनिधित्व नाही.राज्याचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून राज्यसभा हे गृह ओळखले जाते.मात्र राज्यसभेत सर्व राज्यांना समान जागा दिलेल्या नाहीत. लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधित्व दिलेले असल्यामुळे लहान राज्यांना अत्यंत कमी प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

वरील वैशिष्टयेचा विचार केल्यास भारतीय संघराज्याचे एकात्म स्वरूप स्पष्ट होते.तसेच केंद्र सरकारला अवाजवी अधिकार असल्याने केंद्र बलवान झालेले दिसते.

**प्र.३ रा.केंद्र व राज्य यांच्यातील संबंध स्पष्ट करा?**

भारतीय राज्यघटनेत केंद्राचे अधिकार कोणते असतील, राज्याचे अधिकार कोणते असतील यांचा स्पष्ट उल्लेख घटनेत केलेला दिसतो.भारतात केंद्र व राज्य संबंध पुढील तीन मुद्दांच्या आधारावर स्पष्ट करता येतात.

**अ) कायदेविषयक संबंध-** घटनेच्या सातव्या परिशिष्टाच्या तीन विषयसुचीचा समावेश आहे.या सूचीद्वारे केंद्र व राज्यातील कायदेशीर संबंध स्पष्ट करता येतात.

१. **केंद्र सूची** -केंद्र सूची सर्वात मोठी असून त्यात ९७ विषयाचा समावेश केलेला आहे.त्यात संरक्षण, रेल्वे, पोस्ट व तारायंत्र, हवाईमार्ग, राष्ट्रीय महामार्ग व बंदरे इ.राष्ट्रीय दृष्टिकोनातून महत्वपूर्ण विषयाचा समावेश केंद्रसूचीत केलेला आहे.केंद्रसूचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहे.संसदेने केलेला कायदा सर्व व्यक्ती, संस्था व राज्यावर बंधनकारक आहे.

२. **राज्यसूची** - स्थानिकदृष्टया महत्वपूर्ण ६६ विषयाचा समावेश राज्यसूचीत समावेश केलेला आहे.या सूचीत पोलीस, तुरूंग, आरोग्य, शेती, कायदा व सुव्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था इ.विषयाचा समावेश आहे.या विषयावर कायदा करण्याचा अधिकार राज्याला असून तो कायदा त्या राज्यापुरता लागू होतो.

३. **समवर्ती सूची -** संपूर्ण देशासाठी एकच धोरण व कायदा असावा असे वाटते पण आवश्यक वाटत नाही.अशा ४७ विषयाचा समावेश या सुचीत आहे.त्यात विवाह, घटस्फोट, वारसा हक्क, फौजदारी कायदा इ.विषयाचा समावेश आहे.या सूचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्र व राज्य दोघांनाही कायदा करता येतो.मात्र एकाच विषयावर दोघांनी कायदा केल्यास राज्याचा कायदा रद्द होतो. केंद्राचा कायदा ग्राहय धरला जातो.

४. **शेष अधिकार -**ज्या विषयाचा समावेश तिन्ही सूचीत केलेला नाही त्यांना शेषअधिकार असे म्हणतात.कारण काळाच्या ओघात नवीन विषय निर्माण होतात.त्या विषयाचा समावेश घटनेत नसतो.या विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्राला आहे.

५. **राज्यसूचीवर केंद्राचे वर्चस्व -**राज्यसूचीतील विषयावर काही विशिष्ट परिस्थितीत केंद्राला कायदा करता येतो.

**a)** राष्ट्रहितासाठी राज्यसूचीतील विषयावर कायदा करण्याची गरज असेल तर राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव मंजूर केल्यास केंद्राला राज्यसूचीतील विषयावर कायदा करता येतो.

**b)** परराष्ट्रशी केलेल्या तह व कराराच्या अंमलबजावणीसाठी केंद्राला राज्यसूचीतील विषयावर कायदा करता येतो.

**c)** एखादया घटकराज्याने राज्यसूचीतील विषयावर कायदा करावा अशी संसदेला विनंती केल्यास संसद राज्यसूचीतील विषयांवर कायदा करते.तो कायदा त्या संबंधित राज्यापुरता लागू होतो.

**d)** राष्ट्रपती राजवटीच्या काळात राज्याचे विधिमंडळ बरखास्त झालेले असल्याने त्या काळात संबंधित राज्यासाठी संसद राज्यसूचीतील विषयावर कायदे करते.

वरील तरतूदीचा विचार केल्यास केंद्र व राज्य कायदेशीर संबंधात केंद्राचे जास्त वर्चस्व दिसून येते.

**ब) प्रशासकिय संबंध -** संघराज्य शासनाचे यश केंद्र व राज्य परस्पर सहकार्यावर अवलंबून असते.काही कारणामुळे केंद्रराज्यात संघर्ष निर्माण होऊ शकतो म्हणून घटनेत प्रशासकिय संबंधाद्वारे केंद्राचे राज्यावर नियंत्रण ठेवलेले आहे.

१. **केंद्रीय कार्य राज्याकडे सोपविणे-** केंद्रसरकार आपली काही कार्य राज्याची संमती घेऊन राज्याच्या अधिकाऱ्याकडे सोपविते.त्या काळात आपली प्रशासकिय सत्ता राज्यांना वापरण्यासाठी देते.उदा.सार्वजनिक निवडणुका घेण्याचे कार्य केंद्र राज्याच्या अधिकाऱ्यांकडे सोपविते मात्र या कार्याचा खर्च केंद्राकडून दिला जातो.

२. **राज्या-राज्यात प्रशासकिय सहकार्य वाढविणे-** राज्याराज्यात निर्माण होणाऱ्या वादविवाद व संघर्षावर तोडगा काढण्याचा अधिकार केंद्राला आहे.राज्या-राज्यात संघर्ष निर्माण झाल्यास केंद्र आंतरराज्य परिषद निर्माण करून त्या संघर्षाची चौकशी करणे, सल्ला देणे, संघर्ष मिटविण्याचा प्रयत्न करणे इ.कार्य करू शकते.

३. **केंद्राद्वारे राज्यांना मार्गदर्शन-** संसदेने केलेला कायदा सर्व राज्याना लागू होतो.त्या कायदाची अंमलबजावणी करतांना अडथळे येऊ नयेत म्हणून राज्याने आपली कार्यकारी सत्ता केंद्राच्या

आदेशाप्रमाणे वापरावी.केंद्र व राज्य यांच्या कार्यकारी सत्तेत समान धोरण असावे विरोधाभास असू नये.ही घटनात्मक तरतूद आहे.

४. **अखिल भारतीय सेवा-** घटनेनुसार केंद्र व राज्य सेवा अलग-अलग आहेत.पण अखिल भारतीय सेवेचे अधिकारी दोन्ही सरकारच्या ठिकाणी कार्य करू शकतात.याअधिकाऱ्याना भारतात कुठेही काम करावे लागते.या अधिकाऱ्यामार्फत केंद्र राज्य प्रशासनावर नियंत्रण ठेवते.

अशा प्रकारे केंद्र व राज्य प्रशासकिय संबंधात देखील केंद्राचे वर्चस्व दिसून येते.

**क) आर्थिक संबंध -** केंद्र व राज्य आर्थिक संबंध अंत्यत नाजूक बाब आहे.राज्यांना विकास कार्यक्रम राबविण्यासाठी आर्थिक स्वायत्ता दिली पाहिजे होती पण घटनेने राज्यांना स्वायतत्ता दिलेली दिसून येत नाही.घटनेत पुढील प्रमाणे केंद्र व राज्याच्या उत्पन्न बाबीं निश्चित केलेल्या आहेत.

१. **केंद्र सरकार उत्पन्न साधने -** रेल्वे, आयातनिर्यात कर, विमानसेवा, विमा, आयकर इ.करांपासून केंद्राला उत्पन्न मिळते.

२. **राज्य उत्पन्न साधने-** शेतसारा, शेती उत्पन्नावरील कर, मनोरंजन कर, व्यवसाय कर, वाहन कर, यात्राकर इ.करांतून राज्याला उत्पन्न मिळते.

३. **राज्यांना आर्थिक मदत-** प्रत्येक राज्याला खर्चाच्या मानाने उत्पन्नाची साधने कमी दिलेली आहेत.शिक्षण,आरोग्यसारखे खर्चिक विषय राज्याकडे आहेत तर आयकर सारखे जास्त उत्पन्न देणारे कर केंद्राकडे आहेत.म्हणून केंद्राच्या उत्पन्नाचा काही भाग राज्याना आर्थिक मदतीच्या स्वरूपात पुढिल प्रमाणे दिला जातो.

**a)** काही कर केंद्राकडून लावले व वसूल केले जातात पण येणारे उत्पन्न राज्याच्या खात्यात जमा केले जाते.उदा.औषधावरील अबकारी कर

**b)** काही कर केंद्र बसविते जमा करून येणारे उत्पन्न राज्याला दिले जाते उदा.वर्तमानपत्रातील जाहिरात कर

**c)** शेतीप्राप्ती शिवाय अन्य प्राप्ती वरील कर केंद्राकडून लावले जातात.आणि येणारे उत्पन्न केंद्र व राज्यामध्ये वाटले जाते.

४. **अनुदान -** केंद्र राज्यांना तीन प्रकारचे अनुदान देत असते.

**a)** आसाम, बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा या ताग उत्पादक राज्याना ताग निर्यातीच्या मोबदल्यात सहाय्यक अनुदान दिले जाते ती रक्कम राष्ट्रपती निश्चित करतो.

**b)** राज्यातील अनुसूचीत जाती-जमाती विकासासाठी केंद्राच्या संमतीने आखलेल्या योजनांना केंद्र राज्यांना अनुदान देते.

**c)** केंद्र सरकार दरवर्षी ठराविक रक्कम प्रत्येक राज्यांना अनुदान देत असते.

अशा प्रकारे केंद्र व राज्य आर्थिक संबंधातही केंद्राचे वर्चस्व दिसून येते.

**प्र.४ रा.वित्त आयोग रचना,कार्य आणि अधिकार स्पष्ट करा?**

घटनेच्या २८० व्या कलमानुसार राष्ट्रपती घटना अंमलात आल्यापासून दोन वर्षाच्या आत आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षाच्या अखेरीस किंवा आवश्यकता वाटल्यास त्याआधी ही वटहुकूम काढून वित्त आयोगाच्या स्थापनेची तरतूद आहे.साधारणतः भारतात दर पाच वर्षानी वित्त आयोग राष्ट्रपतीकडून नेमला जातो.केंद्र व राज्यसरकार याच्यांत आर्थिक उत्पन्न वाटणी, आर्थिक मदत व अनुदान आणि करवाटणी इ.कारणासाठी आयोग नेमला जातो.

**रचना-** या आयोगात एक अध्यक्ष व चार सदस्य असतात.त्यांची नेमणूक राष्ट्रपतीकडून केली जाते.या आयोगाच्या सदस्यांची नेमणूक करण्यासाठीच्या पात्रता संसद कायदा करून निश्चित करत असते.

**वित्त आयोग अधिकार व कार्य-**आयोगाला पुढील कार्य करावी लागतात.

१. घटनेनुसार केंद्र व राज्य यांच्यात कराचे निव्वळ उत्पन्न करावयाचे असते.त्या संबंधीची मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे वा राज्याराज्यांत उत्पन्न वाटप कसे करावे याबद्दल शिफारशी करणे हे वित्त आयोगाचे महत्त्वपूर्ण काम असते.

२. भारताच्या संचित निधीतून राज्यांना सहाय्यक मदत व अनुदान कोणत्या तत्त्वांच्या आधारावर दयावी ती तत्वे निश्चित करणे.राज्यांना केंद्र उत्पन्नातून किती वाटा वा मदत दिली जावी याबाबत शिफारशी करणे.

३. भारताची अर्थव्यवस्था मजबुत करण्यासाठी राष्ट्रपती मागेल ती मदत वा सल्ला देणे.

वित्त आयोग आपले कार्य करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करतो.तिला संसदेची मान्यता घेतल्यावर वित्त आयोग कार्यास सुरूवात करतो.आयोगाने केलेल्या शिफारशी व त्यावरील राष्ट्रपतीनी केलेल्या उपाययोजना वा सल्ला याबाबत आपला अहवाल वित्त आयोग तयार करून राष्ट्रपतीला देतो.राष्ट्रपती तो अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडतो.हा अहवाल संसदेत मांडणे राष्ट्रपतीवर बंधनकारक आहे.वित्त आयोगाविषयी मत मांडताना प्रा.पायली म्हणतात,"इतर कोणत्याही राज्यघटनेत आर्थिक क्षेत्रात केंद्र आणि राज्यांच्या संबंधात एवढया विस्तृतपणे तरतूदी करण्यात आलेल्या नाहीत.वित्त आयोगाची स्थापना करून उत्पन्नाचे वाटप आणि जमा यात जो समन्वय साधला आहे ती एक महत्त्वाची तरतूद आहे" यावरून वित्त आयोगाचे महत्व लक्षात येते.वित्त आयोगाचे कामकाज संपल्यानंतर आयोग बरखास्त होता.

**प्र.५ वा.घटकराज्य स्वायत्तेची मागणी किंवा केंद्र आणी राज्य संबंधाची सद्यस्थिती सांगा?**

१९५० ते १९६७ पर्यंत केंद्रराज्य संबंध सुरळीत होते.याचे मुख्य कारण म्हणजे केंद्र व राज्यात कॉग्रेस पक्षाची सरकारे होती.मात्र १९६७ नंतर संयुक्त सरकारे वा आघाडी सरकारे अस्तित्वात येऊ लागली.प्रादेशिक पक्षाचे महत्व वाढून काही प्रांतात त्यांना बहुमत मिळुन प्रादेशिक पक्षाची सरकारे निर्माण होऊ लागली.केंद्रातील काँग्रेस सरकार आणी राज्यातील प्रादेशिक पक्षातील सरकार मधील संबंध दिवसेंदिवस बिघडत गेले.त्यामुळे केंद्र व राज्य यांच्यात तणाव वाढू लागला.राज्यांनी स्वायतत्तेची मागणी सुरू केली.केंद्र व राज्यात तणाव पुढील कारणामुळे निर्माण झाला.

१. **राष्ट्रपतीची भूमिका -** राष्ट्रपतीची भूमिका पंच वा न्यायाधीशासारखी निःपक्षपाती असावी.परंतु राष्ट्रपती राज्याराज्यांत भेदभाव व पक्षपाताचा वापर करू लागल्यामुळे केंद्र-राज्य संबंध बिघडले.

२. **राज्यपाल -**राज्यपाल हा राष्ट्रपतीचा प्रतिनिधी असतो.तो राज्याचा घटनात्मक प्रमुख असतो.परंतु राज्यपाल केंद्राचा हस्तक वा गुप्तहेर म्हणून काम करू लागल्यामुळे केंद्र-राज्य संबंधात या पदामुळे तणाव निर्माण झाला.

३. **नियोजन मंडळ -** नियोजन मंडळामुळे केंद्र व राज्य संबंधात तणाव निर्माण झालेला दिसतो.या मंडळामुळे राज्याची स्वायतत्ता भंग होते.कारण नियोजन विषयक धोरण ठरवतांना राज्यांना विश्वासात घेतले जात नाही.मंडळात राज्यांना प्रतिनिधित्व नाही.त्यामुळे या मंडळात केंद्राला प्राधान्य मिळते.राज्यांना दुय्यम दर्जा मिळतो.

४. **विरोधी पक्षाची सरकारे-** १९६७ नंतर अनेक राज्यात विरोधी पक्षाची सरकारे अस्तित्वात येऊ लागली.त्यामुळे केंद्रातील काँग्रेस सरकारने राज्याना मदत करतांना भेदभावाचे धोरण अवलंबिल्यामुळे केंद्राकडे राज्याचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलला.परिणामतः राज्यांनी केंद्राशी संघर्ष करण्याची भूमिका घेतली .त्यामुळे केंद्र-राज्य संबंधात तणाव निर्माण झाला.

५. **राष्ट्रपती राजवट -** राष्ट्रपती राजवट बाबतच्या घटनेतील कलमांमुळे केंद्र-राज्य संबंध बिघडले.राष्ट्रपती राजवटीच्या ३५६ कलमाचा गैरवापर करून केंद्रातील कॉग्रेस व गैर कॉग्रेस सरकारांनी राज्यातील विरोधी पक्षाची सरकारे बरखास्त करण्यासाठी या तरतूदीचा वापर केल्यामुळे केंद्र-राज्य संबंध बिघडले.

**राजमन्नार समिती-**

केंद्र व राज्य याच्यांतील तणाव कमी करण्यासाठी तामिळनाडू सरकारने १९७० मध्ये राजमन्नार समिती नेमली.या समितीने केंद्र-राज्य संबंध सुधारण्यासाठी राज्यांना अधिक स्वायत्ता दयावी ही शिफारस केली.त्यासोबत समितीने पुढील शिफारशी केल्या.

१. घटकराज्यांना आर्थिक, न्यायिक आणि कर आकारणी क्षेत्रात व्यापक अधिकार दयावे.वित्त आयोगामार्फत राज्यांना करामध्ये अधिक वाटा दयावा.
२. राज्यसभेत राज्यांना समान प्रतिनिधीत्व दयावे.तसेच केंद्राचे आणीबाणीचे अधिकार काढून घेण्यात यावे.
३. राज्याच्या अनुमतीशिवाय केंद्राने राज्याच्या कारभारात हस्तक्षेप करू नये.राज्या-राज्यातील प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराज्य मंडळ वा परिषद निर्माण करावी.
४. राज्यपालाची नेमणूक राज्यमंत्रीमंडळाशी चर्चा करून करावी.राज्यपालांचे हक्क कमी करावे.
५. केंद्र आणी समवर्ती सूचीतील काही विषय राज्यसूचीत समाविष्ट करावे.शिक्षण व समाजकल्याणचा खर्च केंद्राने करावा.

राजमन्नार समितीने अत्यंत विस्तृत शिफारशी केल्या पण केंद्राने त्या शिफारशी फेटाळल्यामुळे केद्र-राज्य संबंध अधिकच बिघडले.

**स्वर्णसिंग समिती-**

केंद्र -राज्य संबंध सुधारण्यासाठी कॉंग्रेस पक्षाने स्वर्णसिंग समिती नेमली.या समितीने पुढील शिफारशी केल्या.

१. शेती व शिक्षण विषय समवर्तीसूचीत समाविष्ट करावे मात्र त्यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्याने द्यावी.
२. कोणत्याही राज्याचे पोलिस कोणत्याही राज्यात पाठविण्याचा हक्क केंद्र सरकारला असावा.
३. एखादया राज्यात शांतता स्थापन करण्यासाठी केंद्र सशस्त्र दल पाठवू शकते.ती दले केंद्राच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतील.त्याचे अधिकार, कार्य व मर्यादा संसद निश्चित करेल.

स्वर्णसिग समितीने केलेल्या शिफारशी घटकराज्याच्या स्वायतत्तेचा संकोच करणाऱ्या असल्यामुळे समितीच्या शिफारशीमुळे केंद्र-राज्य संबंधात फारसा बदल झाला नाही.

**सरकारिया आयोग-**

१९८३ मध्ये आर.एस.सरकारिया यांच्या अध्यक्षेखाली केंद्राने केंद्र-राज्य संबंधाचा अभ्यास करण्यासाठी हा आयोग नेमला.या आयोगाने २६५ महत्वपूर्ण शिफारशी केल्या.त्या पुढील प्रमाणे होत.

१. **विधिविषयक संबंध-** सर्व शेषाधिकार समवर्तीसूचीत समाविष्ट करावे. देशहितासाठी समान कायदयाची गरज असेल त्या विषयावर केंद्राने कायदा करावा.
२. **राज्यपाल-** राज्यपाल नेमण्यापुर्वी मुख्यमंत्र्याचा सल्ला घेण्याची घटनात्मक तरतूद करावी.राष्ट्रपती व राज्यपालाने सबळ कारण असल्याशिवाय राज्याची विधयके फेटाळू नयेत.
३. **राष्ट्रपती राजवट -** राष्ट्रपती राजवटीच्या ३५६ कलमाचा अनेकदा गैरवापर झालेला असल्यामुळे या कलमाचा वापर क्वचितच करावा.राज्यातील घटनात्मक यंत्रणा टिकवून ठेवण्याचे सर्व मार्ग संपल्यानंतर शेवटचा पर्याय म्हणून राष्ट्रपती राजवटीचा वापर करावा.
४. **नियोजन मंडळ-** नियोजन मंडळ आणी राष्ट्रीय विकास परिषदच्या कार्यात रचनात्मक बदल करावा.मंडळात राज्यांना योग्य प्रतिनिधित्व दयावे.राज्याशी सर्वच स्तरावर विचार-विनिमय करून नियोजनाचा आराखडा तयार करावा.
५. **आंतरराज्य परिषद -** घटनेच्या २६३ व्या कलमानुसार आंतरराज्य परिषद स्थापन करण्याची तरतूद आहे.पण ही मंडळे केंद्राने स्थापन केली नाहीत.समितीच्या मते ही मंडळे निर्माण केली जावी.कारण त्यामुळे केंद्र-राज्यातील तणाव दूर करण्यासाठी राज्याना स्वतंत्र व्यासपीठ मिळेल.केंद्राची कार्यकारी सत्ता राज्याकडे सोपविण्याची पद्धत आहे.त्या पद्धतीचा अधिक उदारपणे वापर करावा.अखिल

भारतीय सेवाबाबत विचारविनिमय करण्यासाठी एक सल्लागार परिषद निर्माण करावी.देशहितासाठी या सेवा अधिक भक्कम करण्यावर आयोगाने भर दिला.लष्कर पाठविण्यापूर्वी केंद्राने राज्याशी चर्चा करून निर्णय द्यावा.

६. **नैसगिक आपत्ती -** नैसगिक आपत्तीच्या काळात केंद्राने राज्यांना मदत करताना काही संकेत निश्‍चित करावे.तसेच राज्यांना आर्थिकदृष्टया स्वंयपूर्ण बनविण्यासाठी केंद्र-राज्य कराबाबत विचारविनिमय करून राज्याना अधिक मदत द्यावी.

अशा प्रकारे सरकारिया आयोगाने महत्वपूर्ण शिफारशी केल्या पण त्याकडे केंद्राने दुर्लक्ष केल्यामुळे केंद्र व राज्यात सुसंवादाची प्रक्रिया सुरू होऊ शकली नाही.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. संघराज्यासाठी आवश्यक असणाऱ्या तीन प्रमुख गोष्टी सांगा?
उत्तर- अ) लिखीत राज्यघटना ब) अधिकार विभागणी क) न्यायमंडळाचे सर्वश्रेष्ठत्व

२. केंद्र सूची, राज्यसूची व समवर्ती सूचीत किती विषय आहेत?
उत्तर - केद्र सूची - ९७ विषय, राज्यसूची - ६६ विषय आणि समवर्ती सूची- ४७ विषय आहेत.

३. संघराज्याची व्याख्या सांगा.
उत्तर - प्रा.डायसीच्या मते "संघराज्य म्हणजे राष्ट्रीय ऐक्य व सत्ता आणि घटकराज्याचे अधिकार यांचा तऱ्हेने मेळ घालण्याच्या उद्देशाने तयार केलेली राजकीय यंत्रणा होय."

४. भारतीय संघराज्य पद्धतीची दोन वैशिष्टये सांगा.
उत्तर -अ) केंद्रप्रधान संघराज्य ब) एकेरी राज्यघटना व एकेरी न्यायव्यवस्था क) अधिकार विभागणी

५. केंद्र सूचीतील दोन विषय सांगा.
उत्तर- केंद्र सूचीत संरक्षण, रेल्वे, तार व पोस्ट आणि विमा इ.विषय आहेत.

६. राज्य सूचीतील दोन विषय सांगा.
उत्तर - राज्य सूचीत पोलिस, शेती, कायदा आणि सुव्यवस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था इ.विषयाचा समावेश आहे.

७. केंद्र - राज्य संबंध सुधारणेसाठी नेमलेल्या समितीची नांवे सांगा.
उत्तर - केंद्र-राज्य संबंध सुधारण्यासाठी राजमन्नार समिती, स्वर्णसिंग समिती आणि सरकारीया आयोग इ.समित्या नेमल्या होत्या.

८. सरकारीया आायोगातील दोन तरतूदी सांगा.
उत्तर -अ) राज्यपालाची नेमणूक करण्यापूर्वी संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्याशी विचारविनाीमय केंद्राने करावा.
ब) राष्ट्रपती राजवटीच्या ३५६ व्या कलमाचा शेवटचा उपाय वा क्वचित किंवा अत्यावश्यक प्रंसगी वापर करावा.

९. भारतातील कोणत्या राज्याला व कोणत्या कलमान्वये विशेष दर्जा देण्यात आलेला आहे?
उत्तर- भारतात जम्मू - काश्मीर राज्याला घटनेच्या ३७० कलमानुसार विशेष दर्जा दिलेला आहे.

१०. वित्त आयोग घटनेच्या कोणत्या कलमान्वये आणि किती वर्षानी स्थापन केला जातो.
उत्तर- वित्त आयोग घटनेच्या २८० व्या कलमानुसार दर पाच वर्षानी राष्ट्रपतीकडून स्थापन केला जातो.

## प्रकरण ३ रे

## मूलभूत हक्क आणी मार्गदर्शक तत्वे

**प्र.१ ला. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची वैशिष्टये सांगा?**

भारतीय घटनेत १२ ते ३५ कलमात मूलभूत हक्क दिलेले आहेत.त्याची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतात.

१. **विस्तृत नोंद** - जगातल्या कोणत्याही देशाच्या घटनेत इतकी सविस्तरपणे हक्कांची नोंद घेतलेली दिसून येत नाही.भारतीय घटनेत एकूण २४ कलमांमध्ये हक्क दिलेले आहेत.काही हक्क भारतीय तर काही हक्क परकीय नागरीकांना सुद्धा दिलेले आहेत.या उलट काही हक्क फक्त भारतीयांना दिलेले आहेत.उदा.भाषण व लेखन हक्क

२. **सकारात्मक आणी नकारात्मक हक्क** -घटनेत सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारच्या हक्काचा समावेश आहे.नकारात्मक हक्कामधून राज्याच्या अधिकारावर मर्यादा टाकलेल्या दिसून येतात तर व्यक्तीविकासासाठी अनेक सकारात्मक हक्कांचा समावेश घटनेत केलेला आहे. उदा.व्यवसाय स्वातंत्र्य

३. **हक्क संरक्षणाची हमी** - घटनेच्या ३२ व्या कलमानुसार मूलभूत हक्कांना न्यायालयाचे संरक्षण दिलेले आहे.हक्कांवर एखादया व्यक्ती, संस्था वा सरकारने अतिक्रमण केल्यास न्यायालयात दाद मागता येते.न्यायालय हक्क संरक्षणासाठी आदेश काढू शकते.

४. **हक्कांवर मर्यादा** - घटनेने हक्क दिलेले असले तरी अमर्याद स्वरूपात दिलेले नाहीत.प्रत्येक हक्कांबाबत मर्यादा घटनेत दिलेल्या दिसतात.उदा. भाषण स्वातंत्र्याचा अधिकार असला तरी भाषणामुळे कायदा व सुव्यवस्थेला बाद्या पोहचत असेल तर सरकार या अधिकारावर बंदी लादू शकते.

५. **आणाबाणीची तरतूद**-घटनेत तीन प्रकारच्या आणाबाणीचा उल्लेख आहे.आणाबाणीच्या काळात घटनेने दिलेले हक्क स्थगित होतात.या काळात हक्क रक्षणासाठी न्यायालयात दाद मागता येत नाही.

**प्र.२ रा. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क सांगा?**

भारतीय घटनेच्या तिसऱ्या विभागात १२ ते ३५ कलमांमध्ये सुरूवातीला सात मूलभूत हक्काचा समावेश होता.४४ व्या घटनादुरूस्तीने मालमत्तेचा अधिकार हक्कांच्या यादीतून बगळलेला आहे.त्यामुळे घटनेत सद्या सहा मूलभूत हक्क आहेत.घटनाकारांनी कॅनडा, फ्रॉन्स व अमेरिकेच्या घटनांचा विचार करून आपल्या देशाच्या घटनेत हक्कांचा समावेश केलेला आहे

१. **समतेचा हक्क** - घटनेच्या १४ ते १८ कलमांत समतेच्या हक्कांचा समावेश आहे.त्यात पुढील तरतूदीचा समावेश आहे.

a) **कायदयासमोर समानता** - घटनेने प्रत्येक व्यक्तीला कायदयासमोर समान मानलेले आहे. कायदयाचे समान संरक्षण दिलेले आहे.कायदयासमोर समानता म्हणजे व्यक्ती कोणत्याही दर्जाची असो वा हुद्दांची असो कायदयापेक्षा श्रेष्ठ नाही.सर्व कायदे व न्यायालयाचे आदेश सर्वांना समान लागू होतील.राष्ट्रपती असो हि झाडू कामगार समान गुन्हासाठी समान शिक्षा दिली जाईल.

b) **भेदभावाचा अभाव** - घटनेनुसार धर्म, जात, वंश, लिंग व पंथ इ.आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही.रस्ते, सार्वजनिक उपहारगृह व तलाव इ.सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी खुली राहतील.मात्र १६ व्या कलमानुसार लहान बालके, स्त्रिया व मागासलेल्या जाती व जमातीसाठी सरकार विशेष तरतूदी करेल, त्या समतेच्या विरोधी मानल्या जाणार नाहीत.

c) **अस्पृश्यता निवारण** - भारतात प्राचीन काळापासून अस्पृश्यता पाळली जात होती.ही अत्यंत अमानुष रूढी घटनेच्या १७ व्या कलमानुसार घटनाबाहय ठरविण्यात आली.अस्पृश्यता पाळणे फौजदारी गुन्हा आहे.अस्पृश्यतेच्या नावाखाली कुणालाही अपात्र ठरविता येणार नाही.

d) **पदव्यांचे समाप्तीकरण** - ब्रिटिशकाळात रावसाहेब, रावबहादूर, रावदिवाण इ.स्वरूपाच्या भेदभाव निर्माण करणाऱ्या पदव्या दिल्या जात असत.घटनेच्या १८ व्या कलमानुसार या पदव्या रद्द करण्यात

आल्या.मात्र विविध क्षेत्रात विशेष काम करणाऱ्या व्यक्तीचे कौतुक करण्यासाठी सरकार पदव्या देऊ शकते उदा. भारतरत्न पदवी मात्र या पदव्या नसून पदके आहेत.तसेच राष्ट्रपतीच्या परवानगीशिवाय भारताच्या नागरिकाला परदेशातील पदवी स्विकारता येणार नाही.

२. **स्वातंत्र्याचा हक्क -** घटनेच्या १९ ते २२ कलमात स्वातंत्र्याच्या हक्काचा समावेश आहे.१९ व्या कलमात पुढील हक्क दिलेले आहेत.

a) **भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य -** भाषण व लेखनाद्वारे व्यक्ती आपले विचार इतरांसमोर ठेऊ शकते.म्हणून घटनेने हे स्वातंत्र्य नागरिकांना दिलेले आहे.मात्र या हक्कावर काही मर्यादा टाकलेल्या आहेत उदा.कायदा सुव्यवस्था नष्ट होईल वा एखादया व्यक्तीचे चारित्र्यहनन होईल असे भाषण व लेखन करता येणार नाही.आणि केल्यास सरकार भाषणावर बंदी लादू शकते.

b) **निशस्त्रपणे सभा भरविणे -** घटनेने शांततापूर्वक सभा भरविण्याचा अधिकार नागरिकांना दिलेला आहे.कारण सभा भरविल्याशिवाय आपले विचार लोकांसमोर मांडता येणार नाहीत.मात्र हा अधिकार अमर्याद स्वरूपात नाही.सार्वजनिक शांततेला बाद्या पोहचत असेल तर सरकार या अधिकारावर बंदी लादू शकते.

c) **संघटन स्वातंत्र्य -** घटनेने व्यक्तिमत्त्व विकासासाठी संस्था व संघटना स्थापन करण्याचा अधिकार दिलेला आहे.या अधिकाराचा वापर करून सांस्कृतिक व राजकीय संघटना स्थापन करता येतात.मात्र हा अधिकार अमर्याद नाही.देशाच्या एकात्मतेला बाद्या पोचवणाऱ्या संघटनेवर सरकार बंदी लादू शकते उदा.महाराष्ट्र सरकारने सिमी संघटनेवर बंदी लादली.

d) **संचार स्वातंत्र्य-** घटनेनुसार भारतीय नागरिकाला भारतात कुठेही संचार करता येईल त्यासाठी परवानगीची गरज राहणार नाही.मात्र सरकारने सुरक्षित घोषित केलेल्या क्षेत्रात सरकारच्या परवानगीशिवाय प्रवेश करता येणार नाही.

e) **वास्तव्य स्वातंत्र्य-** भारताच्या नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागात जाऊन वास्तव्य करण्याचा अधिकार घटनेने दिलेला आहे.पण वास्तव्यामुळे सार्वजनिक हिताला धोका वा बाद्या येत असेल तर सरकार बंदी लादू शकते.

f) **व्यवसाय स्वातंत्र्य -** भारतात पूर्वी जातीच्या आधारावर व्यवसाय केला जात असे एका जातीचा व्यवसाय दुसऱ्या जातीला करता येत नसे.सद्या घटनेनुसार भारतीयांना कोणत्याही व्यवसाय करता येईल.मात्र काही व्यवसाय करण्यासाठी सरकार पात्रता लादू शकते.

g) **व्यक्ती स्वातंत्र्याची हमी -** घटनेच्या २० ते २२ कलमात व्यक्ती स्वातंत्र्य रक्षणासाठी पुढील तरतूदी केलेल्या आहेत.२० व्या कलमानुसार प्रचलित कायदयानुसार गुन्हा सिद्ध होत नाही तोपर्यंत कोणत्याही व्यक्तीला गुन्हेगार मानले जाणार नाही.एका गुन्हासाठी एकचदा शिक्षा दिली जाईल.२१ व्या कलमानुसार व्यक्तीचे जीवित व स्वातंत्र्य कायदयाने घालून दिलेल्या पद्धतीशिवाय हिरावून घेता येणार नाही. २२ व्या कलमानुसार अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासाच्या आत न्यायाधीशासमोर हजर केले जाईल.मात्र परकिय नागरिक व प्रतिबंधक स्थानबध्दता कायदयाखाली अटक केलेल्या व्यक्तीला ही सवलत मिळणार नाही.

३. **शोषणाविरूध्द वा पिळवणूकीविरूध्दचा हक्क -** भारतात फारपूर्वी पासून वेठबिगारी, देवदासी, सतीप्रथा व गुलामाची खरेदी विक्री इ.रूढी अस्तित्वात होत्या.या रूढींच्या माध्यमातून पद्दलित वर्गाची आणी स्त्रियाची पिळवणूक सुरू होती.म्हणून घटनेच्या २३ व्या कलमानुसार या सर्व रूढी घटनाबाहय मानण्यात आल्या.सक्तीचा वेश्या व्यवसाय तसेच १४ वर्षाच्या आतील लहान मुलाकडून शारीरिक काम करून घेण्यास बंदी लादण्यात आली.२४ व्या कलमानुसार सरकार सार्वजनिक हितासाठी नागरिकांकडून एखादे काम करून घेऊ शकते.उदा.युद्धकाळात सक्तीने लष्कर भरती मात्र सक्ती करतांना जात, धर्म, लिंग इ.आधारावर भेदभाव करता येणार नाही.

४. **धार्मिक स्वातंत्र्य -** घटनेच्या २५ ते २८ कलमात धार्मिक स्वातंत्र्याचा समावेश आहे.हिंदुस्थानची फाळणी धर्म घटकावर झालेली असल्याने घटनाकारांनी धर्म ही वैयक्तिक बाब मानली.प्रत्येक

व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार धर्म बदलण्याचा, पुजा व अर्चा करण्याचा अधिकार दिलेला आहे. धार्मिक कार्यासाठी नागरिक धार्मिक संस्था वा मंडळ निर्माण करू शकतात.धार्मिक कार्यासाठी देणगी गोळा करता येते.मात्र देणगी गोळा करतांना सक्ती करता येत नाही.सरकारी मदतीवर चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही वा विशिष्ट शिक्षण घेण्याची सक्ती केली जाणार नाही.या तरतूदीचा विचार करता भारत धर्मनिरपेक्ष देश आहे.कारण भारताचा अधिकृत असा कोणताही धर्म नाही.सर्व धर्मांना समान स्थान आहे.

५. **सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क -** घटनेच्या २९ व्या कलमानुसार प्रत्येक नागरिकाला आपली भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा अधिकार आहे.तसेच सरकारी मदतीवर चालणाऱ्या संस्थेत धर्म, जात, लिंग इ.आधारावर भेदभाव केला जाणार नाही वा प्रवेश नाकारता येणार नाही.३० व्या कलमानुसार भाषिक व धार्मिक अल्पसंख्याक आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी शिक्षण संस्था स्थापन करू शकतात.या संस्थाना मदत करताना सरकार कोणताही भेदभाव करणार नाही.या हक्काच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाला संरक्षण देण्याचा प्रयत्न घटनेने केलेला दिसतो.

६. **घटनात्मक उपायोजनेचा हक्क-** घटनेच्या ३२ व्या कलमानुसार मूलभूत हक्काना न्यायालयाचे संरक्षण दिलेले आहे.हक्कांवर कुणी ही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास न्यायालयात दाद मागता येते.हक्क रक्षणासाठी उच्च व सर्वोच्च न्यायालयात पाच प्रकारचे अर्ज दाखल करता येतात.

**a) बंदीप्रत्यक्षीकरण-** एखादया व्यक्तीला बेकायदेशीररीत्या अटक केलेली असेल तर त्या व्यक्तीला वा तिच्या मित्र व नातेवाईकाना हा अर्ज करता येतो.अर्ज मान्य झाल्यास अटक केलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर हजर केले जाते.अटक करणाऱ्याला अटकेची कारणे द्यावी लागतात.ती कारणे अयोग्य वाटल्यास न्यायालय संबंधित व्यक्तीची सुटका करू शकते याचा अर्थ सरकार कुणालाही कारणाशिवाय अटक करू शकत नाही.

**b) परमादेश -** एखादया व्यक्तीवर अन्याय झाल्यास अन्याय दूर करण्यासाठी परमादेश अर्जाचा उपयोग करता येतो.उदा.एखादया कारखान्यात अपघात झाल्यास कंपनी कायदयानुसार मालक नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ करत असेल तर या अर्जाचा वापर करता येतो.न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास संबंधित व्यक्तीवरील अन्याय दूर करण्याचा आदेश न्यायालय देत असते.

**c) अधिकारपृच्छा -** कोणतेही सरकारी वा सार्वजनिक पद पात्रता नसतांना एखादी व्यक्ती भूषवित असेल आणि ते पद कायमस्वरूपी असेल. त्या पदाशी आपले हितसंबंध गुंतलेले असतील तर न्यायालयात हा अर्ज करता येतो.न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास अपात्र व्यक्तीस पद सोडण्याचा आदेश न्यायालय देते.

**d) प्रतिषेध -** एखादा खटला कनिष्ठ न्यायालयात सुरू असेल तो खटला चालविण्याचा कनिष्ठ न्यायालयास अधिकार नसेल वा त्या न्यायालयाकडून निर्णय घेणे योग्य वाटत नसेल तर हा अर्ज करता येतो.वरिष्ठ न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास कनिष्ठ न्यायालयाताल खटल्याचे कामकाज ताबडतोब थांबविले जावे असा आदेश वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयास देते.

**e) उत्पेक्षण -** कनिष्ठ न्यायालयात चालत असलेला खटला वरिष्ठ न्यायालयात चालवावा अशी विनंती करणाऱ्या अर्जास उत्पेक्षण असे म्हणतात.हा अर्ज मान्य झाल्यास वरिष्ठ न्यायालय खटल्याशी संबंधित सर्व कागदपत्र आपल्या ताब्यात घेऊन स्वतः निर्णय देते त्यास उत्पेक्षण म्हणतात.

**मूलभूत हक्कांचे मूल्यमापन वा परीक्षण -**

भारतीय राज्यघटनेत समाविष्ट मूलभूत हक्कांवर अनेक विचारवंतानी पुढील टीका केलेल्या दिसतात.

१. **खऱ्या मूलभूत हक्कांचा समावेश नाही -** हक्कांच्या यादीत शिक्षणाचा हक्क, रोजगाराचा हक्क इ.सारख्या महत्वपूर्ण हक्कांचा समावेश केलेला नाही.वास्तविक रोजगाराच्या हक्काबद्दल अनेकदा चर्चा होऊन ही हा हक्क घटनेत समाविष्ट केलेला नाही त्यामुळे हक्कांची यादी अपुरी वाटते.

२. **हक्कांवर मर्यादा अधिक -** घटनाकारानी हक्कांवर प्रचंड मर्यादा टाकलेल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाला मूलभूत हक्क ऐवजी हक्कांवरील मर्यादा हे नांव द्यावे ही टीका केली जाते.उदा.भाषण स्वातंत्र्यावर राज्याची कायदा व सुव्यवस्था, व्यक्तीचे चारित्र्यहनन, अंर्तगत सुरक्षा व परराष्ट्र संबंधाला धोका इ. कारणावरून मर्यादा लादता येतात. या प्रचंड मर्यादांमुळे हक्कांचा पूर्ण उपभोग नागरिकांना घेता येणार नाही.

३. **आणाबाणीच्या काळात हक्क स्थगित -** आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क स्थगित केले जातात.कारण आणीबाणीच्या काळात हक्क संरक्षणासाठी न्यायालयात जाता येत नाही याचा अर्थ आणीबाणी काळात सरकारची दडपशाही जनतेला निमूटपणे सहन करावी लागते.

४. **संदिग्ध वाक्यरचना -** मूलभूत हक्कांच्या यादीत अनेक शब्दप्रयोग संदिग्ध स्वरूपाचे आहेत.सरकार या शब्दाचा आपल्या सोयीनुसार अर्थ लावू शकते.उदा.सार्वजनिक कल्याण, राष्ट्रहित इ. च्या नावावर सरकारने घटनादुरूस्त्या करून हक्क कमी केलेले आहेत.

५. **मार्गदर्शक तत्वे श्रेष्ठ -** सुरूवातीला मूलभूत हक्क श्रेष्ठ आणि मार्गदर्शक तत्वे दुय्यम मानली जात असत पण नंतरच्याकाळात सरकारने घटनादुरूस्त्या करून हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्वांना श्रेष्ठ स्थान दिल्यामुळे हक्काचे महत्व कमी झाले.

अशा प्रकारच्या वरील मर्यादा मूलभूत हक्कांत दिसून येतात.

**मूलभूत कर्तव्ये-**

हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.हक्कांइतकेच कर्तव्यांना महत्व आहे.घटनेत सुरूवातीला मूलभूत कर्तव्याचा समावेश नव्हता.हक्काबरोबर कर्तव्य गृहित धरलेली होती.पण स्वातंत्र्यानंतर लोक कर्तव्य विसरले सर्वत्र हक्कांचा उदोउदो झाला.त्यामुळे सरकारने १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरूस्ती करून घटनेच्या चौथ्या भागात ५१ (अ) कलमांत १० मूलभूत कर्तव्याचा समावेश केला.ती कर्तव्य पुढीलप्रमाणे.

१. घटनेचे पालन करून तिच्यातील आदर्श, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज याचा सन्मान करणे.
२. भारताचे सार्वभौमत्व, एकता व अखंडता यांचा पुरस्कार आणि रक्षण करणे.
३. आपल्या राष्ट्रीय लढयाला प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शाचे जतन करणे व आचरणात आणणे.
४. राष्ट्रांचे संरक्षण आणी गरजेनुरूप राष्ट्रीय सेवा करणे.
५. भारतात वर्गरहित आणि भेदाभेदरहित बंधुत्वाची भावना तयार करणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधक प्रथा नष्ट करणे.
६. आपल्या देशातील एकात्म संस्कृती आणि गौरवशाली परंपरेचे रक्षण करणे.
७. जंगले, सरावरे, नद्या, पशूपक्षी या नैसगिक संपत्तीचे रक्षण करणे व सजीव प्राण्यांबद्दल भूतदया दाखविणे.
८. वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, ज्ञानार्जन आणी प्रगतीच्या भावनेचा विकास करणे.
९. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचारापासून दूर राहणे.
१०. व्यक्तीगत आणी सामुदायिक उत्कर्षाकडे वाटचाल करणे, जेणेकरून राष्ट्राची प्रगती होईल असाच प्रयत्न करणे.

**प्र.३ रा. भारतीय राज्यघटनेतील राज्यांच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे सांगा.**

**किंवा**

**मार्गदर्शक तत्त्वांची उगमस्थाने, प्रकार व वर्गीकरण सांगा?**

घटनेच्या चौथ्या प्रकरणात ३६ ते ५१ कलमामध्ये मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत.सरकारने धोरण ठरविताना वा निर्णय घेतांना या तत्वांचा विचार करावा, ही घटनाकाराची अपेक्षा होती.मूलभूत हक्काप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांना न्यायालयाचे संरक्षण नाही.ही तत्वे शिफारस वा सल्लादायी स्वरूपाची आहेत .या तत्त्वांना कायदयाचे पाठबळ नसले तरी कोणतेही सरकार या तत्त्वांकडे दुर्लक्ष करू शकत नाही.कारण या तत्त्वांद्वारे भारतात सामाजिक व आर्थिक लोकशाही निर्माण करता येऊ शकेल.राष्ट्रहितासाठी ही तत्वे आवश्यक आहेत.

**मार्गदर्शक तत्वांची उगमस्थाने-** राज्यघटनेत या तत्त्वांचा समावेश पुढील घटनामुळे झालेला दिसतो.

**१.** भारतीय घटनाकारांनी आर्यलँडच्या घटनेतून मार्गदर्शक तत्त्वांची संकल्पना घेतलेली आहे.आर्यलँडने स्पेन व फ्रान्सच्या घटनेतून ही संकल्पना स्वीकारलेली आहे.

**२.** १९३५ च्या भारत प्रशासन कायदयात गव्हर्नरने कशाप्रकारे राज्यकारभार करावा यासाठी कायदयाला एक सूचनापत्र जोडले होते.घटनाकारानी ही तत्वे ठरवतांना या सूचनापत्राचा विचार केला होता.

**३.** भारतीय घटना तयार होत असतांना युनोत मानवी हक्कांबद्दल चर्चा सुरू होती.या सनदेचाही प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांवर दिसतो.

**४.** महात्मा गांधीजींच्या राजकीय विचारांचा प्रभाव या तत्त्वांवर दिसतो.

**५.** उदारमतवाद, फेबियन समाजवाद, लोकशाही समाजवाद इ.समाजवादी विचारांचाही प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांवर पडलेला दिसतो.

**मार्गदर्शक तत्वाचे वर्गीकरण वा प्रकार-**

घटनेत मार्गदर्शक तत्वे ३६ ते ५१ कलमात क्रमवार दिलेली आहेत.अभ्यासाच्या सोयीसाठी विचारवंतानी तत्त्वांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण केलेले आहे.

**A. आर्थिक तत्वे-**

घटनेच्या ३८, ३९, ४१, ४२, ४३ आणि ४८ कलमात आर्थिक बाबींशी संबंधित मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत.या तत्त्वांच्या माध्यमातून आर्थिक समता व लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केलेला दिसतो.

**१.** स्त्री व पुरूष दोघांनाही उपजीविकेची साधने मिळण्याचा समान अधिकार असावा.स्त्री व पुरूषांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.

**२.** सामान्य जनतेच्या हितसंबंधाना बाद्या आणणारी आणि उत्पादन साधनाचे केंद्रीकरण करणारी अर्थव्यवस्था नसावी.

**३.** स्त्री व पुरूष कामगारांची प्रकृती व कुवत पाहून काम द्यावे.बालपण व तारूण्याचे आर्थिक व भौतिक पिळवणूकीपासून रक्षण करावे.

**४.** राज्याने शिक्षण व काम मिळवून देण्याचा अधिकार नागरिकांना दयावा.बेरोजगारी, वृद्धत्व, आजार, अंपगत्व इ.काळात सरकारने नागरिकांना मदत करावी.

**५.** कामधंदा व व्यवसायाबाबत न्याय व माणुसकीचे वातावरण तयार करावे.स्त्रियांना प्रसूतीसाठी सवलत व सहाय्य द्यावे.

**६.** शेती व औदयागिक क्षेत्रातील कामगांराना निर्वाह वेतन दयावे.ग्रामीणभागात सरकारी तत्त्वांवर ग्राम व कुटीर उदयोग वाढविण्याचा प्रयत्न सरकारने करावे.

**७.** आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने शेती व पशूपालन व्यवसायाचे संवर्धन करावे.दुभती व शेतीपयोगी जनावरांचे रक्षण करावे.त्यांच्या कतलीस राज्याने बंदी आणावी.

**B. सामाजिक तत्वे-**

घटनेच्या ४५, ४६, ४७ व ४९ व्या कलमात सामाजिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत.समाजात सुधारणा व्हावी म्हणून पुढील तत्त्वांचा समावेश केलेला आहे.

१. १४ वर्षाच्या आतील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीने शिक्षण दयावे.ही योजना घटना अंमलात आल्यानंतर १० वर्षाच्या आत राबवावी.
२. समाजातील दुर्बल घटक म्हणजे अनुसूचीत जाती व जमातीच्या शिक्षण व आर्थिक विकासासाठी राज्याने काळजी घ्यावी.त्यांचे सामाजिक अन्याय व पिळवणूकीपासून रक्षण करावे.
३. आहार, राहणीमान व सार्वजनिक आरोग्याचा दर्जा सुधारावा.अंमली पदार्थाच्या औषधाव्यतिरिक्त वापरावर बंदी लादावी.
४. राष्ट्रीय स्मारके, ऐतिहासिक स्थळे व वास्तूचे रक्षण करावे.त्याच्या संरक्षणसाठी संसदेने कायदे करावे.

**C. राजकिय तत्वे-**

घटनेच्या ४०,४४ आणि ५० कलमात राजकीय स्वरूपाची मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत.ती पुढीलप्रमाणे

१. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रत्येक गावात ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात सरकार पुढाकार घेईल.पंचायतीना स्वतः कारभार पाहण्यास आवश्यक अधिकार देईल.
२. भारताच्या सर्व नागरिकासाठी समान नागरी कायदा निर्माण करण्यासाठी सरकार प्रयत्न करेल.
३. राजकीय सत्तेचे एकत्रीकरण टाळण्यासाठी न्यायमंडळ आणि कार्यकारीमंडळ यांना परस्परांपासून स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न करेल.

**D. परराष्ट्रविषयक किंवा आंतरराष्ट्रीय तत्वे-**

घटनेच्या ५१ व्या कलमात आंतरराष्ट्रीय तत्त्वांचा समावेश केलेला आहे.

१. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्था कायम राखावी, परस्परसहकार्य व न्यायाची आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थापना करावी.
२. राष्ट्रांनी आपसात वागतांना आंतरराष्ट्रीय कायदे व करार आणि संकेताचा आदर करावा.
३. आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे संघर्ष परस्परसामंजस्याने अथवा लवादामार्फत सोडविण्याचा प्रयत्न करावा.

**E. ४२ व्या घटनादुरूस्तीने समाविष्ट तत्वे-**

४२ व्या घटनादुरूस्तीने पुढील मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटनेत केलेला आहे.

१. आर्थिक दृष्टिकोनातून मागासवर्गीयांना कायदेविषयक मोफत सहाय्य करावे.
२. बालकांची निरोगी वाढ व स्वातंत्र्यासाठी त्यांना आवश्यक संधी व सवलती द्याव्यात.
३. कोणत्याही उदयोगात गुंतलेल्या संस्था व संघटनेच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभाग द्यावा.
४. देशातील वने व वन्यप्राणी यांचे रक्षण करण्यासाठी राज्य प्रयत्न करेल.

**मार्गदर्शक तत्वे आणी मूलभूत हक्क यांच्यातील परस्परसंबंध व फरक स्पष्ट करा.**

घटनेत मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे या दोन्ही तत्त्वांचा समावेश लोककल्याण या हेतूसाठी झालेला आहे.या दोघांच्या अंमलबजावणीतून नागरिकांचे जीवन सुखी व समाधानी करता येईल.मात्र या दोन्ही तत्वांमध्ये पुढील मुद्यांच्या आधारे फरक करता येईल.

१. **स्वरूप आणि आधार -** मूलभूत हक्क हे साधारणपणे नकारात्मक स्वरूपाचे आहेत.एखादी कृती करू नये असे शासनावर बंधन टाकतात.याउलट मार्गदर्शक तत्वे सकारात्मक स्वरूपाची आहेत.एखादी कृती सरकारने करावी यासाठी सरकारला सल्ला देते.
२. **श्रेष्ठत्व-** मार्गदर्शक तत्वे श्रेष्ठ की मूलभूत हक्क श्रेष्ठ हा वादाचा मुद्दा आहे.न्यायालयानी दिलेल्या निकालावरून मूलभूत हक्क मार्गदर्शक तत्वापेक्षा श्रेष्ठ आहे असे दिसून येते.तर सरकारने घटनादुरूस्त्या करून हक्कांचे महत्व कमी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

**३. निश्चितता-** घटनेत मूलभूत हक्काचा समावेश एका निश्चित ध्येयासाठी झालेला असल्यामुळे त्यांचे स्वरूप सुस्पष्ट व अचूक शब्दात केलेले दिसते.याउलट मार्गदर्शक तत्वे शिफारस वजा असल्यामुळे घटनेत त्याचे स्वरूप सुस्पष्ट व अचूक दिसून येत नाही.

**४. न्यायालयीन संरक्षण -** मूलभूत हक्कांना न्यायालयाचे संरक्षण आहे.हक्कांवर कोणीही अतिक्रमण केल्यास घटनेच्या ३२ व्या कलमानुसार न्यायालयात दाद मागता येते.याउलट मार्गदर्शक तत्त्वांना न्यायालयाचे संरक्षण नाही.सरकारने ही तत्वे अंमलात आणली नाही तर सरकारविरूद्ध न्यायालयात जाता येत नाही.

**५. परिणामभिन्नता-** घटनेतील मूलभूत हक्कातून नागरिकांना राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ती होते म्हणून हक्कांमुळे राजकीय लोकशाही निर्माण व्हायला मदत होते.याउलट मार्गदर्शक तत्वांमुळे नागरिकांना आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य मिळते म्हणून या तत्त्वांमुळे आर्थिक लोकशाही निर्माण व्हायला मदत होते.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**.

**१.** भारतीय घटनेतील दोन मूलभूत कर्तव्ये सांगा.
उत्तर- १) घटनेचे पालन करून तिच्यातील आदर्श, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज यांचा सन्मान करणे.
२)भारताचे सार्वभौमत्व, एकता व अखंडता यांचा पुरस्कार आणि रक्षण करणे.

**२.** भारतीय राज्यघटनेतील दोन मार्गदर्शक तत्वे सांगा.
उत्तर- अ) सर्व भारतीयांसाठी समान नागरी कायदा निर्माण करणे.
ब) १४ वर्षाच्या आतील सर्व मुला-मुर्लीना मोफत व सक्तीचे शिक्षण राज्याने दयावे.

**३.** राज्यघटनेतील कोणत्या कलमांत मूलभूत हक्कांची तरतूद आहे?
उत्तर- राज्यघटनेतील १२ ते ३५ कलमांत मूलभूत हक्कांची तरतूद आहे.

**४.** भारतीय राज्यघटनेत सद्या किती अधिकार आहेत.
उत्तर- घटनेत सद्या सहा मूलभूत अधिकार आहेत.

**५.** राज्यघटनेतील कोणत्या कलमांत मार्गदर्शक तत्वांची तरतूद आहे?
उत्तर - राज्यघटनेतील ३६ ते ५१ कलमांत मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद आहे.

**६.** घटनेत किती मूलभूत कर्तव्य आहेत.
उत्तर- घटनेत १० मूलभूत कर्तव्याचा समावेशआहे.

**७.** घटनेत मूलभूत कर्तव्या समावेश कोणत्या घटना दुरूस्तीने कोणत्या कलमांत केलेला आहे.
उत्तर- घटनेत मूलभूत हक्कांचा समावेश ४२ घटनादुरूस्तीने आणि प्रकरण ४ मधील ५१ क कलमांत समावेश आहे.

**८.** स्वातंत्र्याच्या हक्कांपैकी कोणतेही दोन हक्क सांगा.
उत्तर - स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्य आणि घटनात्मक उपाययोजनेचा हक्क इ.हक्कांचा समावेश आहे.

**९.** भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांची दोन उगमस्थाने सांगा.
उत्तर- आर्यलँडची राज्यघटना, मानवी हक्क घोषणापत्र, गांधीवादी विचारसरणी इत्यादींतून मार्गदर्शक तत्त्वांचा घटनेत समावेश झालेला दिसतो.

**१०.** मार्गदर्शक तत्वे आणि मूलभूत हक्कांतील मूलभूत फरक सांगा.उत्तर- मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण आहे तर मार्गदर्शक तत्त्वांना न्यायालयीन संरक्षण नाही.

**११.** कोणत्या घटनादुरूस्तीने मालमत्तेचा मूलभूत हक्क घटनेतून वगळण्यात आला.
उत्तर- ४४ व्या घटनादुरूस्तीने संपत्ती वा मालमत्तेचा अधिकार मूलभूत हक्कांतून वगळला.

## प्रकरण- ४ थे.

## अधिकाराच्या संदर्भात अलिकडील बदल

### प्र.१ला. माहितीचा अधिकार कायदयाचे अर्थ, स्वरूप, व्याप्ती महत्त्व व मर्यादा स्पष्ट करा?

### किंवा

### माहिती अधिकार २००५ मधील तरतूदी आणि मर्यादा स्पष्ट करा?

भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही आणि प्रजासत्ताक असलेला देश आहे.व्यक्ती विकासासाठी हक्क आवश्यक असतात.हक्क अनेक प्रकारचे असतात.भारतीय घटनेत मूलभूत हक्कांचा समावेश १२ ते ३५ कलमांमध्ये करण्यात आलेला आहे.सुरूवातीला घटनेत माहितीच्या अधिकारांचा समावेश नसला तरी माहितीचा अधिकार मूलभूत हक्क आहे.कारण भारत प्रजासत्ताक देश असल्यामुळे जनता सार्वभौम आहे.निर्णय प्रक्रियेत जनप्रतिनिधीची भूमिका काय? पैसा कसा खर्च कसा होतो? निर्णयाची अंमलबजावणी कशी होते? याची माहिती देशाचा मालक असलेल्या जनतेला मागण्याचा पूर्ण अधिकार आहे.घटनेच्या १९ व्या कलमात सप्त स्वातंत्र्य दिले आहे.त्यात प्रत्येक व्यक्तीला उच्चार व अभिव्यक्ति स्वातंत्र्य दिले आहे.२१व्या कलमात प्रत्येकाला जीवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे.या दोन्ही कलमात माहितीचा अधिकार अस्पष्ट स्वरूपात घटनेत दिसून येतो.

ब्रिटिश काळात शासकीय माहिती गोपनियतेचा शिक्का मारून बंदिस्त केली जायची त्यासाठी १९२३ला ब्रिटिशांनी शासकीय गोपनियताचा कायदा केला.ब्रिटिश गेले पण हा कायदा आजही लागू आहे.म्हणुन जनतेने शासकीय कारभाराची माहिती मिळावी यासाठी माहितीच्या अधिकाराची मागणी केली.न्यायालयानी दिलेल्या निकालामुळे माहितीच्या अधिकारास पोषक वातावरण निर्माण वा तयार होण्यास मदत झाली.केंद्र सरकारने जनतेच्या दडपणातून माहिती अधिनियम २००५ हा कायदा मंजूर केला.

**माहिती अधिकारांची आवश्यकता आणि महत्त्व**

**१.** नागरिकांमध्ये जनजागृती होऊन लोकमत घडविण्यासाठी हा अधिकार महत्त्वपूर्ण आहे.

**२.** लोकशाहीत सार्वभौम सत्तेचा मालक जनता असल्याने हा मूलभूत अधिकार जनतेला असणे आवश्यक असते.

**३.** लोकशाही राज्यात पारदर्शक प्रशासन आणि भ्रष्ट्राचाराला आळा घालण्यासाठी हा अधिकार आवश्यक आहे.

**४.** प्रशासकीय सेवकांत शिस्त, उत्तरदायित्व, कार्यक्षमता वाढविण्यासाठी हा अधिकार आवश्यक आहे.

**५.** जनतेचा राजकीय सहभाग आणि नेत्यामध्ये राजकीय उत्तरदायित्वाची भावना विकसित आवश्यक आहे.

**माहितीचा अधिकार कायदा २००५-**

जगात सर्वप्रथम स्वीडन देशात माहितीचा अधिकार देण्यात आला.त्यानंतर फ्रॉन्स, अमेरिका, कॅनडा आणि जगातील विविध देशांनी माहिती अधिकार कायदा केला.युनोच्या सनदेतील १९ व्या कलमानुसार सर्व सदस्य देशातील जनतेला सरकारने माहितीचा अधिकार द्यावा अशी तरतूद केली.सर्वप्रथम १९९० मध्ये भारतात माहिती अधिकार कायदयाची चर्चा सुरू झाली.१९९३ मध्ये कंज्यूमर एज्यूकेशन एण्ड रिसर्च,अहमदाबाद संस्थेने माहिती अधिकार कायदाबाबत विस्तृत बिल तयार केले.प्रेस कौन्सिलचे अध्यक्ष वी.पी.सावंत यांनी माहिती अधिकाराबाबत राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करून एक प्रायोगिक विधयेक तयार करून सरकारला पाठविले.१९९७ मध्ये हैद्राबाद येथील एन.आई.आर.डी संस्थने या बिलात संशोधन केले.१९९७ मध्ये एच.डी.शोरी अध्यक्षतेखाली एक सरकारी वर्किग गुप तयार झाला.त्यांने माहिती अधिकार कायदयाच्या आवश्यकतेवर जोर दिला.महाराष्ट्रात अण्णा हजारे, सेवानिवृत्त सनदी अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थाची मागणी लक्षात घेऊन देशात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्यात २००२ मध्ये माहितीचा अधिकार कायदा मंजूर केला.त्यानंतर इतर राज्यांनी कायदे केले.भारत सरकारने २००५मध्ये माहितीचा अधिकार कायदा मंजूर केला.१२

ऑक्टोबर २००५ पासून हा कायदा देशभर लागू झाला.या कायदयामुळे शासनाचे सर्व विभाग व संस्थाच्या कामकाजाची माहिती नागरिकाला मिळवता येते.

**माहिती अधिकार कायदातील तरतूदी-**

**१.** माहिती अधिकार कायदांतर्गत केंद्र आणि राज्य पातळीवर माहिती आयोगाची स्थापना करणे.

**२.** या कायदांतर्गत निर्माण कार्याचे निरीक्षण, सरकारी कार्यालयातील दस्ताऐवज आणि अभिलेखाचे निरीक्षण, दस्ताऐवजावरील टिप्पणीची प्रमाणित प्रतिलिपी प्राप्त करणे, विकास कार्य योजनात वापरली जाणारी सामुग्रीचे नमूने प्रमाणित करणे, इलेक्ट्रॉनिक रूपातील माहितीचे मिळविणे.

**३.** या कायदयान्वये केंद्र आणि राज्याच्या कायदयाने स्थापन झालेल्या सरकारी, गैरसरकारी संस्था, सरकारी अनुदान प्राप्त संस्था, संसद वा विधानसभा कायदयाने निर्माण झालेल्या संस्था आणि माहिती आयोगाने बंधनकारक केलेल्या संस्थामधुन माहिती मिळविता येईल.

**४.** या कायदयानुसार सरकारी माहितीचे अवलोकन करून सत्यप्रती वा सरकारी रेकॉर्ड प्रतिलिपी मागू शकतो.

**५.** या कायदयानुसार विविध शासकीय विभाग वा कार्यालयाद्वारे वेळावेळी प्रकाशित सूचना किंवा सक्षम अधिकाऱ्यांकडे अर्ज करून माहिती मिळविता येते.

**६.** दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या व्यक्तींना मोफत देण्याची तरतूद या कायदयात आहे.

**७.** केंद्र आणि राज्य माहिती आयोगांचा निर्णय बंधनकारक आहे.

**८.** आपल्या विभागाचे कर्तव्य, कार्य, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची माहिती, निर्णय प्रक्रिया, पर्यवेक्षण, उत्तरदायित्व, अधिकारी आणि कर्मचारी कर्तव्य निर्वचन नियम, योजनाचा प्रस्तावित खर्च, अनुदान, माहिती अधिकारांचे नाम, पदनाम इत्यादींची माहिती प्रत्येक कार्यालयाने स्वतः प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

**माहिती अधिकार कायदयातील मर्यादा-**

घटनेने प्रत्येक नागरिकाला माहितीचा अधिकार दिलेला असला तरी कलम ७ नुसार खालील मर्यादा घातलेल्या आहेत.

**१.** देशाची सुरक्षितता आणि सार्वभौमत्व, अखंडता, सुरक्षा धोरण, वैज्ञानिक आणि आर्थिक धोरण धोक्यात येईल अशी माहिती या कायदयान्वये देण्यास मनाई केली आहे.

**२.** संसद व विधिमंडळाच्या विशेष अधिकाराचा भंग होईल.तसेच व्यक्तिचे जीवन धोक्यात येईल.ज्या माहितीमुळे गुन्हेगाराना अटक करणे वा खटला भरण्यास अडथळा निर्माण होईल अशी माहिती देता येत नाही.

**३.** सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तींच्या खाजगीबाबीं आणि खाजगी जीवनाबद्दल माहिती मागता येत नाही.

**४.** न्यायालयीन अवमान वा न्यायालयाच्या कामात अडथळा निर्माण होईल अशी माहिती मागण्यास कायदयाने बंदी आहे.

**५.** व्यावसायिक गोपनियता भंग होईल अशी माहिती मागता येत नाही.मंत्री, सचिव आणि अधिकाऱ्यांच्या विचारविमर्श अभिलेख मागता येत नाही.

**६.** केंद्र सरकारने स्थापन केलेल्या गुप्त वार्ता, सुरक्षा एजन्सीकडून सुरक्षासंबंधी माहिती मागता येत नाही.

वरिल बंधनात राहून माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी करावी लागते.माहितीचा अधिकार मूलभूत अधिकार असुन त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता निर्माण होऊन लोकशाही परिपक्व होण्यास मदत होते.हा अधिकार दुहेरी हत्यार आहे.कारण या कायदयाचा मोठया प्रमाणावर दुरूपयोग होऊ शकतो.त्यासाठी जनतेने जागरूक राहुन या अधिकाराचा काळजीपूर्वक वापर केला पाहिजे.कारण या अधिकाराच्या माध्यमातून भ्रष्टाचार,वशिलबाजी आणि सार्वजनिक संपत्तीच्या उधळपट्टीला आळा बसू शकतो.

**माहिती अधिकाराची प्रक्रिया-**

या कायदयामुळे शासनाच्या सर्व विभाग व संस्थांच्या कामकाजाची माहिती नागरिकांला मिळवता येते.माहिती देण्यासाठी प्रत्येक कार्यालयात एक सक्षम अधिकारी नियुक्त केलेला असतो.माहिती मिळवू ईच्छीणाऱ्या व्यक्ती आवश्यक शुल्क आणि विशिष्ट नमुन्याचे प्राधिकृत अधिकाऱ्याकडे अर्ज करू शकते.प्राधिकृत अधिकाऱ्यांला ३० दिवसाच्या आंत माहिती देणे कायदयाने बंधनकारक आहे.विशिष्ट कारणास्तव माहिती देता येत नसेल तर तशा प्रकारची लेखी अर्जदारास देणे कायदयाने आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार कायदयाखाली अर्ज करूनही संबंधित अधिकारी टाळाटाळ करत असेल वा चुकीची आणि अपुरी माहिती देत असेल तर त्याविरूद्ध अपिलीय अधिकाऱ्याकडे विशिष्ट फी आणि नुमना अर्ज करून अपिल करता येते.४५ दिवसांच्या आत या अपिलाचे उत्तर देणे बंधनकारक असते.अपिलीय अधिकाऱ्यांने दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्यास माहिती आयुक्ताकडे अपील करता येते.याबाबत माहिती आयुक्ताचा निर्णय अंतिम मानला जातो.त्याने ९० दिवसाच्या आत निर्णय देणे बंधनकारक असतो.माहिती अधिकारी माहिती देण्यास नकार देत असेल, वेळेच्या आत माहिती देत नसेल, जाणूनबजून चुकीची वा अपूर्ण माहिती देत असेल किंवा माहिती देण्यात अडथळा आणत असेल तर अशा अधिकाऱ्यास प्रतिदिन २५० रू ते २५ हजार रूपयापर्यंत दंड केला जाऊ शकतो.

**प्र.२ रा. केंद्रीय माहिती आयोग रचना, कार्य आणि अधिकार स्पष्ट करा?**

माहिती अधिकार कायदा २००५ ची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय माहिती आयोगाची स्थापना करण्यात आली.कायदयानुसार सोपविलेली कार्य पार पाडण्यासाठी मुख्य माहिती आयुक्त आणि जास्तीत जास्त दहा आयुक्त नेमलेले असतात.केंद्रीय माहिती आयोगाचे कार्यालय दिल्ली येथे आहे.

**नेमणूक व कालावधी-** मुख्य आयुक्त आणि इतर आयुक्तांची नेमणूक करण्यासाठी राष्ट्रपती पंतप्रधान, लोकसभा विरोधी पक्ष नेता, प्रंतप्रधानानी नामनिर्देशित केलेला एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री समिती नेमलेली असते.समितीने शिफारस केलेल्या व्यक्तींची राष्ट्रपती मुख्य आयुक्त पदी नेमणूक करतो.मुख्य माहिती आयुक्त आणि आयुक्त पदधारण केल्यापासून पाच वर्षाच्या कालावधी पर्यंत पदावर राहतो.ते पुननियुक्तीसाठी पात्र नसतात.वयाच्या ६५ वर्षापर्यंत पदावर राहता येते.आयुक्तांना राष्ट्रपती वा नियुक्ती समितीसमोर शपथ घ्यावी लागते.गैरवर्तणुकीच्या कारणावरून राष्ट्रपती आयुक्ताला पदावरून दूर करू शकतो.मुख्य आयुक्तांचे वेतन मुख्य निवडणूक आयुक्ताइतके असते.

**अधिकार व कार्य-**

१. माहिती मागणाऱ्या व्यक्तीला योग्य माहिती न मिळाल्यास किंवा नकार, दिशाभूल, अपूर्ण माहिती, जास्त शूल्क आकारणी इत्यादी संबंधी तक्रारी स्वीकारणे आणि त्यांची चौकशी करणे.

२. तक्रारी वा दाव्याची न्याय चौकशी करण्यासाठी कागदपत्रे मागविणे, निरीक्षण करणे, साक्षी पुरावा घेणे, शपथ पत्रावर पुरावा घेणे.

३. योग्य त्या शासकीय प्राधिकरणाच्या नियंत्रणातील अभिलेखाची तपासणी करणे.

४. अधिनस्थ आयुक्त, कर्मचारी यांच्यावर नियंत्रण ठेवणे.

५. अपिलीय अधिकाऱ्याकडून आलेल्या दाव्याचा पुर्नविचार करणे, अपिलीय अधिकाऱ्याकडून आलेल्या अपीलाचा न्यायनिवाडा वा चौकशी करणे.

**प्र.३ रा. राज्य माहिती आयोग रचना, कार्य आणि अधिकार स्पष्ट करा?**

माहिती अधिकार कायदा २००५ ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्यात आली.कायदयानुसार सोपविलेली कार्य पार पाडण्यासाठी मुख्य माहिती आयुक्त आणि जास्तीत जास्त दहा आयुक्त नेमलेले असतात.राज्य माहिती आयोगाचे कार्यालय मुंबई येथे आहे.

**नेमणूक व कालावधी-** मुख्य आयुक्त आणि इतर आयुक्तांची नेमणूक करण्यासाठी राज्यपाल मुख्यमंत्री, विधानसभा विरोध पक्ष नेता आणि मुख्यमंत्र्यानी नामनिर्देशित केलेला एक कॅबिनेट मंत्री समिती नेमलेली असते.समितीने शिफारस केलेल्या व्यक्तींची राज्यपाल मुख्य आयुक्त पदी नेमणूक करतो.मुख्य माहिती आयुक्त आणि आयुक्त पदधारण केल्यापासून पाच वर्षाच्या कालावधी पर्यत पदावर राहतो.ते पुननियुक्तीसाठी पात्र नसतात.वयाच्या ६५ वर्षापर्यत पदावर राहता येते.आयुक्तांना राज्यपाल वा नियुक्ती समितीसमोर शपथ घ्यावी लागते.गैरवर्तणुकीच्या कारणावरून राज्यपाल आयुक्ताला पदावरून दूर करू शकतो.राज्य मुख्य आयुक्तांचे वेतन राज्य मुख्य निवडणूक आयुक्ताइतके असते.

**अधिकार व कार्य-**

१. माहिती मागणाऱ्या व्यक्तीला योग्य माहिती न मिळाल्यास किंवा नकार, दिशाभूल, अपूर्ण माहिती, जास्त शूल्क आकारणी इत्यादी संबंधी तक्रारी स्वीकारणे आणि त्यांची चौकशी करणे.
२. तक्रारी वा दाव्याची न्याय चौकशी करण्यासाठी कागदपत्रे मागविणे, निरीक्षण करणे, साक्षी पुरावा घेणे, शपथ पत्रावर पुरावा घेणे.
३. योग्य त्या शासकीय प्राधिकरणाच्या नियंत्रणातील अभिलेखाची तपासणी करणे.
४. अधिनस्थ आयुक्त,कर्मचारी यांच्यावर नियंत्रण ठेवणे.
५. अपिलीय अधिकाऱ्याकडून आलेल्या दाव्याचा पुर्नविचार करणे,अपिलीय अधिकाऱ्याकडून आलेल्या अपीलाचा न्यायनिवाडा वा चौकशी करणे.

**प्र.४था. मानव अधिकार संकल्पना सांगुन मानव अधिकार आयोग रचना,कार्य व अधिकार स्पष्ट करा?**

व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अधिकारांची गरज असते.प्रा.लास्कीच्या मते 'कोणत्याही राज्याचा दर्जा तेथील नागरिकांना राज्य किती अधिकार देते यावरून ठरते.' आधुनिक काळात सामाजिक,राजकीय आणि आर्थिक अधिकारांची संकल्पना महत्त्वाची असली तरी मानव अधिकार संकल्पना या सर्वांपेक्षा व्यापक संकल्पना आहे.मानव अधिकार हे व्यक्तींच्या व्यक्तीमत्त्व, जीवन विकास, सुखाशी संबंधित आहेत.भारताने मानवी अधिकारांच्या जागतिक जाहीरनामा निर्मितीमध्ये सक्रिय सहभाग घेतलेला होता.भारताने मानवाधिकार परिषदा, करारात सहभाग घेतलेला आहे.भारतीय राज्यघटनेत मानव अधिकार जाहीरनाम्यातील अनेक तरतूदींचा समावेश केलेला आहे.म्हणून मानव अधिकारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**मानव अधिकारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी-**

मानव अधिकाराचा उगम ग्रीक व रोमन इतिहासात दिसून येते.प्लेटो, ॲरिस्टॉटल, राजा जॉनने दिलेल्या मॅग्नाकार्टा सनदेत आणि मध्ययुगात अनेक विचारवंतानी मानव अधिकाराचे समर्थन केलेले दिसतेइंग्लंडमध्ये लोकशाहीचा विकास होत असतांना बिल ऑफ राईट, पिटीशन ऑफ राईट इ.कायदयांनी मानव अधिकारांच्या विकासात मोलाची भर घातली.फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनाम्यानंतर मानव अधिकार संकल्पना जनसामान्यामध्ये रूजण्यास प्रारंभ वा सुरूवात झाली.जॉन लॉक, रूसो, जॉन मिल, थॉमस पेन इत्यादी विचारवंतानी अधिकार संकल्पनेचा विकास केला.२४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली.संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेनंतर मानव अधिकाराला वैश्विक मान्यता मिळाली.संयुक्त राष्ट्र संघटनेने स्थापन केलेल्या एलिनार रूझवेल्ट आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार १० डिंसेबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा

जाहिरनामा प्रसिद्ध केला.त्यात ३० मानवी हक्कांचा समावेश होता.युनोच्या घोषणापत्रानुसार प्रत्येक राष्ट्राने मानव अधिकाराचे रक्षण करण्यासाठी मानव अधिकार आयोगाची स्थापना करावी, अशी विनंती केली.त्यासाठी युनोने १९७८ला जिनेव्हा येथे एक कार्यशाळा आयोजित करून जिनिव्हा संमेलनात एक ठराव संमत करण्यात आला.भारतात अल्पसंख्याक आयोगाने मानव अधिकार आयोग स्थापनेची मागणी केली.१९९१ च्या निवडणूक जाहिरनाम्यात काँग्रेस पक्षाने आयोग स्थापनाचे आश्वासन दिले.पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहरावच्या काळात सर्व मुख्यमंत्र्याच्या संमेलनात चर्चा होऊन आयोग करण्यास तत्वत:मान्यता दिली .संसदेने १२ ऑक्टोबर १९९३ ला मानव अधिकार आयोग स्थापना करण्यास मंजुरी दिली.

**भारतीय राज्यघटना आणि मानव अधिकार-**

भारतीय राज्यघटनेची निर्मिती होत असतांना युनोने मानव अधिकार घोषणापत्र जाहीर केले.भारताने देखील मानव अधिकार घोषणापत्र निर्मितीत सक्रिय सहभाग घेतला.भारतीय घटनाकारांनी मानवाधिकार घोषणापत्रातील विविध तरतूदींचा घटनेतील विविध भागात समावेश केलेला आहे.कारण मानव अधिकार भारतीय नागरिकांच्या व्यक्तिमत्त्व विकास,प्रगती आणि सुखात वाढ घडवुन आणण्यात उपयुक्त आहेत.भारतीय राज्यघटनेतील पुढील भागात मानव अधिकारांचा समावेश केलेला आहे.

१. **प्रस्तावना-** प्रस्तावनेत देशातील सर्व नागरिकांसाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, दर्जा व संधीची समानता, सर्व नागरिकांमध्ये व्यक्ती प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व अखंडतेचे आश्वासन देणारी बंधुता प्रस्तापित करण्याचे वचन देऊन प्रस्तावनेने एक प्रकारे मानव अधिकार जाहीरनाम्यातील तत्त्वांचा समावेश केलेला आहे.प्रस्तावनेत मानव अधिकारांच्या उच्च उद्देशांवर आधारित संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

२. **मूलभूत अधिकार-** जागतिक मानव अधिकार जाहीरनाम्यातील कलम २ ते २१ मधील अधिकार भारतीय घटनेच्या प्रकरण तीनमधील मूलभूत हक्कांच्या १२ ते ३५ कलमांत समाविष्ट केलेले आहे.यात समता, स्वातंत्र्याचा हक्क, पिळवणुकीपासून संरक्षण, धर्म स्वातंत्र्य, शैक्षणिक व सांस्कृतिक स्वातंत्र्याचा समावेश केलेला आहे.

३. **राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये-**मानव अधिकारांच्या जागतिक जाहीरनाम्यातील २२ ते २८ मधील अधिकार भारताच्या राज्यघटनेच्या प्रकरण चार मधील ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ठ केलेले आहेत.१९७६ मध्ये झालेल्या ४२ घटनादुरूस्तीने समाविष्ठ मूलभूत कर्तव्यामध्ये देखील मानव अधिकारांतील काही महत्त्वपूर्ण गोष्टींचा समावेश ५१ अ कलमांत केलेला आहे.

४. **घटनात्मक उपाय-**भारतीय घटनेत प्रकरण तीन मध्ये मूलभूत हक्कांचा समावेश केलेला आहे.त्यातील कलम ३२ मध्ये घटनात्मक उपाययोजनेचा हक्क दिलेला आहे.घटनेने प्रदान केलेल्या हक्कांचा उपभोग घेतांना एखादी व्यक्ती, संस्था वा सरकार कडून अडथळा येत असेल वा आपल्या हक्कांवर कोणी अतिक्रमण करत असेल तर हक्क संरक्षणासाठी न्यायालयात जाता येते.सर्वोच्च न्यायालय हक्कांच्या संरक्षणासाठी बंदीप्रत्यक्षीकरण, परमादेश, अधिकारपृच्छा, उत्पेक्षण, प्रतिषेध इत्यादी पाच प्रकारचे आदेश काढू शकते.घटनेने फक्त हक्क दिलेले नाही तर त्यांच्या संरक्षणाची भक्कम तरतूद केलेली आहे.घटनेच्या २२६ कलमानुसार उच्च न्यायालयांनाही हक्क संरक्षणासाठी वरील आदेश काढता येतात.

५. **वैधानिक उपाय-** मानवी अधिकारांच्या प्रभावी सरंक्षणासाठी केंद्र सरकारने 'मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३' संमत केलेला आहे.हा कायदा संपूर्ण भारतासाठी बंधनकारक आहे.या कायदयानुसार मानव अधिकारावर देखरेख करण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य मानव अधिकार आयोग स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे.

अशा मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी घटनेत तरतूदी केलेल्या दिसतात.

**प्र.५ वा. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग रचना, अधिकार आणि कार्य सांगा.**

मानव अधिकार कायदयानुसार १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.मानव अधिकारांच्या उल्लंघनावर लक्ष ठेवण्यासाठी हा आयोग निर्माण करण्यात आला.या आयोगाचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे.

**रचना-**मानव अधिकार आयोगात एक अध्यक्ष व चार पूर्णकालिक सदस्य आणि चार मानद सदस्य असतात.अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश पदाचा अनुभव असलेली व्यक्ती तर चार सदस्यात एक सर्वोच्च न्यायालयातील कार्यरत अनुभवी न्यायाधीश किंवा माजी न्यायाधीश तर दुसरा उच्च न्यायालयात कार्यरत न्यायाधीश किंवा माजी मुख्य न्यायाधीश आणि उरलेले दोन सदस्य मानव अधिकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ति असतील.मानद सदस्यात राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग व राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षाचा समावेश असतो.

**नेमणूक-**आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक राष्ट्रपतीमार्फत पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चाधिकार समितीद्वार केली जाते.या समितीचे अध्यक्ष पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय गृह मंत्री, लोकसभा व राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते आणि राज्यसभेचा उपाध्यक्ष केली जाते.

**कार्यकाल-** आयोग आणि अध्यक्ष, सदस्य कार्यकाल पदभार सांभाळल्यापासून ५वर्ष किंवा वयाची ७० वर्ष पूर्ण होईपर्यत असतो.या वयोमर्यादेच्या आत पुर्ननेमणूक केली जाऊ शकते.

**सचिवालय-** आयोगाचे सचिवालय महासचिवांच्या मागदर्शनाखाली कार्य करते.महासचिव भारत सरकारच्या सचिव दर्जाचा अधिकारी असतो.तो आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो.आयोगात एक महासचिव, चौकशी विभाग, प्रशासकिय विभाग, सूचना विभाग व संशोधन विभाग हे पाच विभाग कार्यरत आहेत.

**मानव अधिकार आयोगाचे अधिकार व कार्य -** मानव अधिकार आयोगाला पुढिल कार्य पार पाडावी लागतात.

१. मानव अधिकार उल्लंघन विषयक तक्रारीची नोंद घेणे आणि त्याबाबत कार्यवाही करणे.
२. भारत सरकार व घटकराज्य सरकारच्या तुरूंगातील कैदयाची चौकशी करून शिफारशी करणे.तरूगांना भेटी देऊन सरकारला उपचारात्मक सूचना करणे.
३. मानव अधिकाराबाबत जनतेला माहिती देऊन हक्काबद्दल जागरूकता निर्माण करणे.
४. मानव अधिकार कायदयाचे पुर्नमूल्यांकन करून ते लागू करण्याची शिफारस करणे.हक्क संरक्षणासाठी घटनेने केलेल्या सुरक्षा उपायाचे परीक्षण करून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीचे उपाय सूचविणे.
५. मानव अधिकारांना बाधा आणणाऱ्या घटकांचे दहशतवादी कृत्यासहित, परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजना सूचविणे.अतिरेक्यांच्या स्थितीबाबत मूल्यांकन करून उपचारात्मक सूचना करणे.
६. आंतरराष्ट्रीय कराराचा अभ्यास करून अंमलबजावणी बाबत योग्य त्या सूचना करणे.
७. मानव अधिकार क्षेत्रात कार्यरत गैरसरकारी संघटनाना प्रोत्साहित करणे वा मदत देणे.समाजातील विविध गटात मानव अधिकारांचा प्रसार करणे वा हक्क संरक्षणासाठी उपलब्ध सुरक्षा उपायाबाबत जनजागृती करणे.
८. मानव अधिकाराबाबत संशोधन कार्य सतत सुरू ठेवणे आणि मानव अधिकारात वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे.

**राज्य मानव अधिकार आयोग रचना-**

मानव अधिकार कायदयानुसार १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राज्य मानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.राज्यातील मानव अधिकारांच्या उल्लंघनावर लक्ष ठेवण्यासाठी आणि सरंक्षण करण्यासाठी हा आयोग निर्माण करण्यात आला.या आयोगाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

**रचना-**मानव अधिकार आयोगात एक अध्यक्ष व तीन सदस्य असतात.अध्यक्ष उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश पदाचा अनुभव असलेली व्यक्ती तर एक उच्च न्यायालयातील कार्यरत अनुभवी न्यायाधीश किंवा माजी न्यायाधीश किंवा ७ वर्ष अनुभव असलेला जिल्हा न्यायाधीश तर एक सदस्य मानव अधिकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतील.राज्य शासनाचा सचिव दर्जाचा अधिकारी आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो.

**नेमणूक-**आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक राज्यपाल मार्फत मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चाधिकार समितीद्वार केली जाते.या समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री, राज्याचे गृह मंत्री, विधानसभा सभापती, विधानसभा विरोधी पक्ष नेते आणि विधानपरिषद राज्यात अस्तित्वात असेल तर तिचा सभापतीचा समावेश असतो.

**कार्यकाल-** आयोग आणि अध्यक्ष, सदस्य कार्यकाल पदभार सांभाळल्यापासून ५वर्ष किंवा वयाची ७० वर्ष पूर्ण होईपर्यत असतो.सदस्यांना ७० वर्ष वयापर्यंत काम करता येते.वयोमर्यादेच्या आत पुननेमणूक केली जाऊ शकते.

**मानव अधिकार आयोगाचे अधिकार व कार्य -** मानव अधिकार आयोगाला पुढिल कार्य पार पाडावी लागतात.

१. मानव अधिकार उल्लंघन विषयक तक्रारीची नोंद घेणे आणि त्याबाबत कार्यवाही करणे.
२. घटकराज्य सरकारच्या तुरूंगातील कैदयाची चौकशी करून शिफारशी करणे.तुरूगांना भेटी देऊन सरकारला उपचारात्मक सूचना करणे.
३. मानव अधिकाराबाबत जनतेला माहिती देऊन हक्काबद्दल जागरूकता निर्माण करणे.
४. मानव अधिकार कायदयाचे पुर्नमूल्यांकन करून ते लागू करण्याची शिफारस करणे.हक्क संरक्षणासाठी घटनेने केलेल्या सुरक्षा उपायाचे परीक्षण करून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीचे उपाय सूचविणे.
५. मानव अधिकारांना बाधा आणणाऱ्या घटकांचे दहशतवादी कृत्यासहित,परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजना सूचविणे.अतिरेक्यांच्या स्थितीबाबत मूल्यांकन करून उपचारात्मक सुचना करणे.
६. आंतरराष्ट्रीय कराराचा अभ्यास करून अंमलबजावणी बाबत योग्य त्या सूचना करणे.
७. मानव अधिकार क्षेत्रात कार्यरत गैरसरकारी संघटनाना प्रोत्साहित करणे वा मदत देणे.समाजातील विविध गटात मानव अधिकारांचा प्रसार करणे वा हक्क संरक्षणासाठी उपलब्ध सुरक्षा उपायाबाबत जनजागृती करणे.
८. मानव अधिकाराबाबत संशोधन कार्य सतत सुरू ठेवणे आणि मानव अधिकारात वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे.
९. राज्य मानव अधिकार आयोगाची कार्य व अधिकार राष्ट्रीय आयोगाप्रमाणेच आहेत.मात्र केवळ राज्य व समवर्ती सूचीमधील समाविष्ठ विषयांशी संबंधित मानव अधिकार उल्लंघनाची चौकशी करण्याचा अधिकार राज्य आयोगाला आहे.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. माहिती अधिकार केव्हा संमत झाला आणि अंमलात आला.
उत्तर- माहिती अधिकार २००५ मध्ये संमत झाला आणि १२ ऑक्टोबर २००५ पासून अंमलात आला आहे.

२. भारतात माहिती अधिकार कोणत्या राज्यात सर्वप्रथम संमत झाला होता.
उत्तर- माहिती अधिकार महाराष्ट्रात राज्यात २००२ मध्ये सर्वप्रथम संमत झाला होता.

३. मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती कोण करतो.
उत्तर- मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपती नियुक्त पंतप्रधान, लोकसभा विरोधी पक्ष नेता आणि पंतप्रधान नामनिर्देशित कॅबिनेट समिती करत असते.

४. केंद्रीय व राज्य माहिती आयुक्तांची नेमणूक किती वर्षासाठी आणि किती वर्षापर्यंत असते.
उत्तर- केंद्रीय व राज्य माहिती आयुक्त पाच वर्षासाठी आणि वयांच्या ७० वर्षापर्यंत पदावर राहता येते.

५. मानव अधिकार घोषणापत्र युनोने केव्हा जाहीर केले होते.
उत्तर-युनोने मानवअधिकार घोषणापत्र १० डिंसेबर १९४८ रोजी घोषित केले.

६. भारतात मानवअधिकार अधिनियम केव्हा संमत झाला.
उत्तर-भारतात मानवअधिकार अधिनियम १२ ऑक्टोबर १९९३ रोजी संमत झाला.

७. मानव अधिकार आयोग अध्यक्ष किती वर्ष आणि वयाच्या कोणत्या वर्षापर्यंत पदावर राहू शकतात.
उत्तर- मानव अधिकार आयोग अध्यक्ष पाच वर्ष आणि वयाच्या ७० वर्षापर्यंत पदावर राहू शकतात.

८. घटनेतील कोणकोणत्या भागात मानवी हक्कांचा समावेश आहे.
उत्तरे- घटनेत प्रस्तावना वा सरनामा,मूलभूत हक्क आणि मागदर्शक तत्त्वांत मानवी हक्काची समावेश आहे.

९. जगात माहितीचा अधिकार सर्वप्रथम कोणत्या देशात आणि कोणत्या वर्षी देण्यात आला होता.
उत्तर- जगात सर्वप्रथम स्वीडन देशात १७६६ मध्ये माहिती अधिकार देण्यात आला.

१०. मानव हक्क दिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो.
उत्तर- मानव हक्क दिन १० डिंसेबर रोजी साजरा केला जातो.